




दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com



**1,22,570**

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**





● वर्ष : ०३ ● अंक : ०५६ ● पुणे ● शनिवार, दि. ०८ नोव्हेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




खासदार चषक क्रिकेट स्पर्धेत रंगत आहेत... 3



मतविभाजनाचा फायदा कोणाला? 4

# पुण्यात आणखी एक १५०० कोटींचा गैरव्यवहार!

## बोपोडी जमीन प्रकरणात एकनाथ खडसेंचा मोठा खुलासा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कोरेगाव पार्क येथील जमीन गैरव्यवहार प्रकरण सध्या चांगलेच चर्चेत आहे. यादरम्यान पुण्यातील बोपोडी येथे बनावट कागदपत्रांच्या आधारे सरकारी जमीन बळकावल्याचा आणखी एक प्रकार उजेडात आला आहे. याप्रकरणी गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते एकनाथ खडसे यांनी आज पत्रकार परिषद घेत या घोटाळ्यासंबंधी सविस्तर माहिती दिली आहे. पुणे शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेली ही सुमारे १५०० कोटीची जमीन कशी नावावर करण्यात आली याबद्दल खडसे यांनी मोठे खुलासे केले आहेत.

खडसे म्हणाले की, काल पुणे येथील खडक पोलीस ठाण्यात एक एफआयआर दाखल झाला. हा एफआयआर हेमंत गावंडे, राजेंद्र विद्वांस, ऋषिकेश विद्वांस, मंगल विद्वांस तसेच विद्यानंद पुराणिक, जयश्री संजय एकबोटे, शीतल तेजवानी, दिग्विजय अमरसिंह पाटील यांच्याविरोधात झाला. सर्वे नं. ६२, फायनल प्लॉट नं. १४ बोपोडी १४ या गट नंबरसंबंधी आहे. हा गट नंबर १५ एकरचा आहे. या सर्वांनी बनवट कागदपत्रे तयार करून त्यांनी ही जमीन आपल्या नावावर करून घेतल्याचा गुन्हा आहे, अशी माहिती एकनाथ खडसे यांनी दिली आहे.

ही जमीन फार पूर्वी पेशव्यांची जमीन होती, त्या काळात भट म्हणून एक कुटुंब होतं. त्या कुटुंबाला पेशव्यांनी उदर निर्वाहासाठी ही जमीन दिली होती. त्यामध्ये एक अट होती की, कुटुंबामध्ये जोपर्यंत मुलगा होत राहिल तोपर्यंत राहिल मुलगी जन्माला आली तर हा अधिकार राहाणार नाही. त्या कुटुंबात जोपर्यंत मुलगा होता तोपर्यंत हा अधिकार त्यांच्याकडे राहिला नंतर मुलगी जन्माला आल्यानंतर हा अधिकार संपला. ही जमीन सरकारजमा झाली. नंतर १८८३ पासून ही सरकारी जमीन आहे.

१९२० साली ही जमीन कृषी महाविद्यालयासाठी देण्यात आली. तेव्हापासून ही कृषी विभागाकडे आहे. ही जमीन अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणी आहे. शिवाजीनगर परिसरातील या जमीनीला मोठा भाव आहे. आजचा बाजारभावाप्रमाणे याची किंमत पाहिली तर पंधराशे कोटीं रूपयांच्या आसपासची ही जमीन आहे, असे एकनाथ खडसे म्हणाले.

१५०० कोटी रूपयांची ही जमीन विद्वांस कुटुंबाला हाताशी धरून हेमंत गावंडे, तेजवानी या कंपीनीने आम्ही कूळ आहोत असे कागदपत्रे तयार केले. ही जमीन कृषी महाविद्यालयाच्या अखत्यारीत असताना त्यांनी हा प्रकार २००९ पासून सुरू केला. तेव्हापासून या जमीनीचा पाठपुरावा केला जात होता, असा आरोप एकनाथ खडसे म्हणाले.

## चाकणकरांचा राजीनामा मागितला म्हणून पाटलांना नोटीस





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटानं त्यांच्याच प्रवक्त्या रूपाली पाटील ठोंबरे यांना कारणे दाखवा नोटीस जारी केली आहे. रूपाली पाटील यांनी राष्ट्रवादीच्याच नेत्या आणि राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्याविरूद्ध टीका केली होती. हेच प्रकरण रूपाली पाटील यांना भोवण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेसनं आपल्या नोटिशीत रूपाली पाटील यांनी पक्षाची शिस्त मोडल्याचं म्हटलं आहे. ही नोटीस राष्ट्रवादी काँग्रेस राज्य संघटनेचे सचिव संजय खोडके यांच्या सहीनं पाठवण्यात आली आहे. रूपाली पाटील ठोंबरे यांना सात दिवसाच्या आत नोटिशीला उत्तर देण्यास सांगण्यात आलं आहे. जर तसं केलं नाही तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असा इशारा देखील देण्यात आला आहे.

रूपाली पाटील ठोंबरे यांनी काही महिला संघटनांच्या साथीनं पुण्यात महिला आयोगाच्या कार्यालयाबाहेर आंदोलन केलं होतं. त्यांनी हे आंदोलन सातारा जिल्ह्यातील महिला डॉक्टरच्या जीवन संपवण्याच्या प्रकरणात केलं होतं. त्यावेळी ठोंबरे यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्याविरूद्ध आंदोलन करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती.

## ठळक बातम्या

### भाजप राज्यमंत्र्यांच्या मतदारसंघात सर्वाधिक अतिक्रमणे

**पुणे (आरंभ पर्व) :** शहरातील विविध भागांत जाऊन महापालिका आयुक्त नवल किशोर राम सध्या पाहणी करीत असून, नागरिकांशी संवाद साधत आहेत. या पाहणीत पर्वती विधानसभा मतदारसंघामध्ये सर्वाधिक अतिक्रमणे झाल्याचे निरीक्षण महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी नोंदविले आहे. 'ही अतिक्रमणे काढण्यासाठी लवकरच मोहीम हाती घेतली जाणार आहे. यानंतर वाहतुकीसाठी अतिरिक्त २० टक्के जागा उपलब्ध होईल,' असे आयुक्त राम यांनी स्पष्ट केले. शहरात जवळपास दोन लाखाच्या पुढे अनधिकृत व्यावसायिक आहेत. शहरातील फेरीवाले आणि पथारी व्यावसायिकांना महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून राष्ट्रीय फेरीवाला धोरणानुसार वार्षिक शुल्क आकारून फेरीवाला प्रमाणपत्र दिले जाते. मात्र, गेल्या काही वर्षांपासून ही नोंदणी बंद करून प्रमाणपत्र दिले जात नसल्याने बेकायदा पद्धतीने रस्त्यांवर पथारी व्यावसायिकांची संख्या वाढत असल्याचे समोर आले आहे.

### 'पीएमआरडीए'चा 'मास्टर प्लॅन'!

**पुणे (आरंभ पर्व) :** 'पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) नागरी सुविधांसह उद्योगांसाठी पायाभूत सुविधांची आखणी करण्यात आली आहे. त्याअंतर्गत पुढील पाच वर्षांत २०८ प्रकल्प हाती घेण्यात येणार असून, ३३ हजार ७०० कोटी रुपयांच्या निधीतून विविध पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात येणार आहे. येत्या काही दिवसांत 'पीएमआरडीए'च्या माध्यमातून यातील ९०० कोटी रुपयांची कामे सुरू होणार आहेत,' अशी माहिती 'पीएमआरडीए"चे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिली. औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची कार्यशाळा 'पीएमआरडीए'च्या वतीने घेण्यात आली. या वेळी आयुक्त डॉ. म्हसे म्हणाले, 'उद्योग आणि व्यवसायांच्या वाढीसाठी औद्योगिक संघटना आणि उद्योजकांच्या अडचणींचे निराकरण करणे महत्त्वाचे आहे.



**प्रतिक गंगणे**

## थकबाकीदारांना मिळणार चक्क ७५ टक्के सवलत

● **महापालिकेने जाहीर केली योजना !**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**


नागरिकांकडे असलेली मिळकतकराची थकबाकी वसूल करण्यासाठी अभय योजना राबविण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. १५ नोव्हेंबर ते १५ जानेवारी या दोन महिन्यांच्या कालावधीसाठी 'अभय योजना' राबविली जाणार आहे. यासाठी थकबाकीच्या दंडावर ७५ टक्के सवलत मिळणार आहे. यापूर्वीच्या 'अभय योजने'चा लाभ घेतलेल्या थकबाकीदार मिळकतदारांना मात्र याची सवलत दिली जाणार नाही. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी अभय योजना राबिणार असल्याची माहिती दिली.

महापालिकेची मिळकरदारांकडे सुमारे बारा हजार कोटी रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये ३ हजार १५८ कोटी मुळ मिळकतकराची थकबाकी असून, त्यावर दंडाची रक्कम ९ हजार कोटी रुपयांची आहे. वर्षानुवर्षे हा मिळकतकर थकीत असल्याने महापालिका प्रत्येक महिन्याला त्यावर दोन टक्के व्याज आकारते. परिणामी, थकबाकीची रक्कम वाढतच असल्याचे समोर आले आहे. ही थकबाकी वसूल करण्यासाठी महापालिका प्रशासनाने 'अभय योजना' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे प्रलंबित थकबाकी वसूल होऊन महापालिकेच्या तिजोरीत निधी जमा होईल, असे महापालिका आयुक्त राम यांनी सांगितले. यावेळी अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी, मिळकतकर विभागाचे उपायुक्त अविनाश सपकाळ उपस्थित होते.

ही योजना आणताना यापूर्वीच्या 'अभय योजने'चा फायदा घेत थकबाकी भरलेल्या आणि पुन्हा थकबाकीदार झालेल्या मिळकतदारांना याचा फायदा देऊ नये, अशी मागणी सजग नागरिक मंचाचे विवेक वेलणकर यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे केली होती. 'या मागणीची दखल घेऊन नियमित मिळकतकर भरणाऱ्यांवरदेखील कोणताही अन्याय होणार नाही.

महापालिकेची प्रलंबित थकबाकी वसूल करण्यासाठी 'अभय योजना' आणण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. त्याची अंमलबजावणी १५ नोव्हेंबरपासून सुरू केली जाईल.

## पर्दाफाश : मेलेल्या माणसांनी स्वत:च केला अर्ज



**वाघोली (दै. आरंभ पर्व)**

वाघोलीतील (ता. हवेली) सातव नामक मतदार गावठाणात राहणारे व वर्षानुवर्ष मतदान करणाऱ्या ३८ मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यासाठी निवडणूक अधिकारी यांच्याकडे अर्ज करण्यात आला. हा अर्ज त्यांनी स्वतःहून केल्याचे दाखविण्यात आले आहे. मात्र, प्रत्यक्ष त्यातील एकाही मतदाराने असा अर्ज केलेला नाही. धक्कादायक बाब म्हणजे दोन व्यक्ती मयत असणाऱ्या मतदारांनाही स्वतःहून अर्ज केल्याचे दाखविण्यात आले आहे.

वाघोलीतील भाग क्रमांक ३१४ गावठाण मधील हे मतदार आहेत. वाघोली बूथ अधिकारी हे त्या अर्जाची छाननी करण्यासाठी मतदारापर्यंत पोहोचल्यानंतर ही धक्कादायक बाब उघडकीस आली.

शिरूर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे हे अर्ज प्राप्त झाल्यानंतर ती नावे वगळण्यासाठी बीएलओकडे तपासणीसाठी ३८ मतदाराच्या नावांची यादी आली होती. या यादीत मतदारांनीच त्यांची स्वतःची नावे वगळण्यासाठी अर्ज केल्याचे दाखविण्यात आले आहे. यामध्ये दोन मयत नावांचाही समावेश आहे. मयत उमेदवार यांनी तहसील कार्यालयात चालत जाऊन स्वतः हा अर्ज केला का? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. आज जाणूनबुजून केलेला प्रकार असून असा बोगस प्रकार करणाऱ्या दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करण्याची मागणी या मतदारांनी केली आहे.

# विवाह मंडळांकडून फसवणुकीचा प्रकार



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विवाह मंडळांच्या माध्यमातून योग्य जोडीदार शोधणाऱ्या कुटुंबांना लक्ष्य करून काही मंडळांकडून संगनमताने फसवणुकीचा प्रकार सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एकाच वधूचा फोटो वापरून विविध नावांनी आणि बनावट माहितीसह बायोडेटा तयार करून इच्छुकांना पाठवले जात असल्याचे उघड झाले आहे. या माध्यमातून आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी स्वारगेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सध्या अनेक विवाह मंडळे समाजमाध्यमे, वेबसाइट्स आणि मोबाईल ॲपच्या माध्यमातून कार्यरत आहेत. इच्छुक व्यक्तींच्या दिलेल्या माहितीनुसार बायोडेटा तयार केला जातो. मात्र काही बोगस मंडळे हेच माध्यम गैरकायद्याने वापरत आहेत.

एका वधूचा फोटो घेऊन, शैक्षणिक पात्रता, व्यवसाय, पत्ता आणि जात बदलून अनेक खोटे प्रोफाइल्स तयार केली जातात.


यानंतर, हे बायोडेटा वेगवेगळ्या नावांनी इच्छुकांना पाठवले जातात आणि विश्वास संपादन करून शुल्काची मागणी केली जाते. पैसे मिळाल्यानंतर फोन, ईमेल आणि संपर्क पत्ता गायब होतो.

राज्य महिला आयोगाकडे झालेल्या तक्रारीनंतर या फसवणुकीच्या प्रकरणात तीघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार राजेश रामचंद्र बेल्हेकर (वय ६१, रा. महर्षीनगर, पुणे) यांनी सांगितले की, "मुलाच्या विवाहासाठी मंडळांच्या माध्यमातून वधू शोधत असताना विविध नावांनी आलेले बायोडेटा पाहिले, पण फोटो एकाच मुलीचा असल्याचे लक्षात आले. ही गंभीर फसवणूक आहे आणि अशा रॅकेटवर कारवाई आवश्यक आहे."

"विवाह मंडळात नोंदणी करण्यापूर्वी त्या संस्थेची विश्वासार्हता तपासावी. अनोळखी ठिकाणाहून आलेल्या बायोडेटावर विश्वास ठेवू नये आणि पडताळणी केल्याशिवाय प्रत्यक्ष भेट घेऊ नये," असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

डॉ. गौरी कानिटकर, संस्थापिका, अनुरूप विवाह संस्था म्हणाल्या, "आमच्याकडे नोंदणी करताना आम्ही सर्व कागदपत्रांची तपासणी करतो. वधू किंवा वराची खोटी माहिती भरली जाणार नाही, याची काळजी घेतो. नागरिकांनीही विवाह मंडळ, संकेतस्थळ किंवा ॲपची विश्वासार्हता तपासूनच पुढील व्यवहार करावा. हे पाऊल घेतल्यास अशा फसवणुकीला आळा बसू शकतो."

# याला जबाबदार कोण?

जेवढ्या जास्त जनतेची अडवणूक करण्याची क्षमता, तेवढी जबाबदारी अधिक. पण, संघटित शक्तीला याचा बऱ्याचदा विसर पडतो. संघटना मोठी असेल आणि अन्य समाजाची अडवणूक करण्याची ताकदही असेल, तर अशा संघटित शक्तीला नेहमीच अधिक चेव येतो. अशा संघटनेचं नेतृत्व किती परिपक्व आणि संयमी आहे, यावर त्या संघटनेची लोकाभिमुखता आणि ओळख ठरत असते. सेंट्रल रेल्वे मजदूर संघाच्या मुंबई शाखेला गुरुवारी याचा नेमका विसर पडला. त्यांनी केलेल्या आंदोलनामुळे झालेल्या प्रवाशांच्या गोंधळात तीन जणांचा हकनाक बळी गेला. सेंट्रल रेल्वे मजदूर संघ ही रेल्वे उद्योगातील कर्मचाऱ्यांची मोठी संघटना. मुंबईचं जीवनचक्र सुरळीत ठेवण्यासाठी मुंबईतली लोकल सेवा किती आवश्यक आहे, याची जाणीव या संघटनेला असणारच. संध्याकाळची, कार्यालयं सुटण्याची वेळ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकात किती प्रचंड गर्दीची असते, एखादी लोकल रद्द झाली तरी किती गोंधळ होतो याची कल्पना या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना नसणार, असं म्हणताच येणार नाही. तरीही या संघटनेने सुमारे तासभर मोटरमन आणि गार्ड यांची वाट अडवून धरली. अप्रत्यक्ष 'रस्ता रोको' केला. ऐन गर्दीच्या वेळी अडवणूक करण्यासाठी, आपली ताकद (खरे तर उपद्रवमूल्य) सिद्ध करण्यासाठी केलेलं हे अनावश्यक अतिरेकी आंदोलन होतं. आंदोलन पूर्वकल्पना देऊन केलं होतं, हे ठीक. पण, त्याची परिणामकारकता रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लक्षात आली नाही, की छुप्या सहानुभूतीपोटी त्यांच्याकडून या आंदोलनाच्या परिणामांकडे दुर्लक्ष झालं? तीन सामान्य प्रवाशांचा बळी गेला असल्याने या आंदोलनाची आणि आंदोलनात प्रत्यक्ष भाग घेतलेल्या आंदोलकांची चौकशी करणं आता 'रेल्वे' ला भाग आहे. आंदोलनाची नोटीस मिळाल्यानंतरही त्याकडे गांभीर्याने न पाहणाऱ्या अधिकाऱ्यांचा समज नक्की काय होता, आंदोलनासाठी त्यांनी दिलेली परवानगी नक्की कोणत्या स्वरूपाची होती, याचीही शहानिशा झाली पाहिजे. दिलेली परवानगी आणि आंदोलनाचं प्रत्यक्ष रूप, कालावधी यात तफावत होती का? असल्यास किती आणि ती नक्की कोणाकडून? याचंही सत्यशोधन झालं पाहिजे.

रेल्वे कर्मचाऱ्यांच्या या आंदोलनाला पार्श्वभूमी होती पाच महिन्यांपूर्वी मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ झालेल्या अपघाताची. धावत्या लोकलमधून पडून त्या अपघातात पाच प्रवाशांचा बळी गेला होता. त्या अपघातातील 'रेल्वे'ची जबाबदारी नक्की करण्यासाठी मुंबईतील व्हीजेटीआय या तंत्र शिक्षण संस्थेकडे रेल्वेनेच काम दिलं होतं. व्हिजेटीआयने दिलेल्या अहवालानुसार, रेल्वे पोलिसांनी दोन अभियंत्यांविरोधात गुन्हे दाखल केले. गुन्हे दाखल करण्याची ही प्रक्रिया रेल्वे कर्मचाऱ्यांना मान्य नाही. तद्वत हे गुन्हे मागे घ्यावेत, अशी त्यांची मागणी होती आणि त्यासाठी गुरुवारचं आंदोलन होतं. म्हणजे, ज्या अपघातात रेल्वे प्रवाशांचे बळी गेले, त्या अपघाताची नक्की केलेली जबाबदारी मान्य नाही म्हणून झालेल्या आंदोलनात आणखी प्रवाशांचे बळी! 'रेल्वे' नेच नेमलेली समिती, त्या समितीने 'रेल्वे'ला दिलेला अहवाल, त्या अहवालानुसार रेल्वे पोलिसांनी दाखल केलेले गुन्हे, ते मान्य नाही, म्हणून रेल्वे कर्मचाऱ्यांचं आंदोलन-आणि त्यात बळी मात्र प्रवाशांचा. अशा प्रवाशांचा, ज्यांचा ना आरोपपत्राशी संबंध, ना त्यांना आंदोलनाशी काही सोयरसुतक. रेल्वे सेवा ठप्प झाली, म्हणून इच्छित स्थळी वेळेत पोहोचण्यासाठी त्यांनी शक्य होतं, ते केलं. रेल्वेतून उतरून पुढचं स्थानक गाठण्यासाठी त्यांनी रेल्वे रुळातून चालायला सुरुवात केली. त्यात त्यांना मागून आलेल्या रेल्वेचा धक्का बसला. काही जखमी झाले, काही मृत्युमुखी पडले. अनेकदा तांत्रिक कारणाने, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते बंद घडवून आणण्यासाठी रेल्वे सेवा ठप्प करतात तेव्हां, पावसाळ्यात रेल्वे मार्गावर पाणी साठतं तेव्हां...अशा अनेकवेळी चालत्या रेल्वेगाडीत असलेल्या प्रवाशांनी किती काळ ठप्प रेल्वेत बसून राहायचं? उतरून आपल्या इच्छित स्थळाच्या दिशेने चालू लागणं हेच त्यांच्या हाती असतं. अशावेळी रेल्वे मार्गातूनच चालावं लागतंच. दुसरा काय इलाज असतो? हे 'रेल्वे'लाही माहीत आहे. किंबहुना अशा आपदस्थितीत महिलांना, वृद्धांना डब्यातून रेल्वे मार्गावर उतरताना त्रास होऊ नये, दुखापत होऊ नये यासाठी काही वर्षांपूर्वी डब्यांना खाली काही पायऱ्यांच्या शिडीची व्यवस्थाही 'रेल्वे'नेच केली आहे. त्यामुळे, सुमारे तासभर रेल्वेसेवा ठप्प झाल्यानंतर आणि त्याबाबतचं कारण अडकून पडलेल्या रेल्वे प्रवाशांपर्यंत पोहोचवण्याची दक्षता न घेतलेल्या 'रेल्वे'ने आता रेल्वे मार्गातून चालताना अपघातात जीव गमावलेल्या निष्पाप जीवांनाच गुन्हेगार ठरवू नये!!

मुंबईत माणसाच्या जीवाची किंमत दिवसेंदिवस घसरतेच आहे. सरकारी यंत्रणांच्या लेखी तर माणसाचा जीव हा नुकसानभरपाईची रक्कम (किंवा वाचलाच तर) उपचाराचा खर्च देण्यापुरताच महत्त्वाचा उरला आहे. कोणताही मोठा अपघात झाला, की काही तासात काही रक्कम जाहीर होते. विषय तिथेच संपतो. मुंबई किंवा अन्य कोणत्याही महानगरात नागरिकांना करावा लागणारा प्रवास हेच त्यांचं जीवन आहे. हे जीवन सुरक्षित करण्याला सरकारच्या यंत्रणांचं सर्वाधिक प्राधान्य असलं पाहिजे. ज्या यंत्रणांच्या हाती प्रवासी सेवा येते, त्यांनी प्रवाशांचा प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित; म्हणजेच शिस्तशीर कसा होईल, यासाठी सतत प्रयत्नशील राहिलं पाहिजे. सेवा हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांना आपल्या जबाबदारीचं भान नसेल, सुरक्षिततेचं महत्त्व त्यांनाच कळत नसेल, त्यांच्या अंगी शिस्त नसेल, तर यंत्रणेत यातले कोणतेच गुण येणार नाहीत. अशा सेवा नागरिकांसाठी निर्धोक राहणार नाहीत. महानगरी जनतेला कायम मृत्यूच्या टांगत्या तलवारीखालीच जगावं लागेल. रेल्वे, पोलीस, रुग्णालय, बस किंवा विमानसेवा या वेगाने वाढणाऱ्या नागरिकरणातील अत्यंत संवेदनशील सेवा आहेत. नागरी जीवनाचा सगळा डोलारा या सेवांवर; पर्यायाने या सेवेतील कर्मचाऱ्यांवर आहे. दुर्दैवाने गेल्या काही वर्षात ही समज लोप पावत चालली आहे. या सेवांवरील अवलंबित्व जसजसं वाढत चाललं आहे, तसतसं आपलं उपद्रवमूल्य वसूल करण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. कर्मचाऱ्यांचे हक्क, त्यांना आपल्या भावना व्यक्त करण्याचा अधिकार असलाच पाहिजे. फक्त त्याला जबाबदारी, संयम आणि विवेकाचं भान असलं पाहिजे. ही अपेक्षा जेवढी कर्मचाऱ्यांकडून आहे, त्यापेक्षा दसपट त्यांच्या नेत्यांकडून आहे. असंघटित प्रवासांचा क्षोभ होतो, तेव्हा काय होतं याचा अनुभव सगळ्यांनाच आहे.

## आमदार शेखर निकम यांच्या प्रयत्नांना यश

**चिपळूण (दै. आरंभ पर्व)**

चिपळूण-संगमेश्वर मतदार संघातील ग्रामविकासाला नवी दिशा देत,आमदार शेखर निकम यांच्या सततच्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे.

मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजने अंतर्गत चिपळूण तालुक्यातील तिवरे,निरबाडे,वालोटी तसेच संगमेश्वर तालुक्यातील किरडुवे आणि फणसवले या गावांच्या ग्रामपंचायत नवीन इमारती बांधणीसाठी तब्बल १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

या निर्णयामुळे ग्रामीण भागातील प्रशासकीय कामकाज अधिक सुसंघटित आणि जनतेसाठी सुलभ होणार आहे. गाव पातळीवर लोकाभिमुख सुविधा उपलब्ध करून देणे आणि गावांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे,हा आमदार शेखर निकम यांचा प्रमुख ध्यास आहे.

त्यांच्या प्रयत्नांमुळे चिपळूण-संगमेश्वर मतदार संघात अनेक विकास कामांना गती मिळाली आहे.यामुळे ग्रामविकासाचे चित्रच बदलत आहे. जनतेच्या गरजांची जाण ठेवून, प्रामाणिक प्रयत्नांद्वारे विकास घडवून आणणारे आमदार शेखर निकम हे खऱ्या अर्थाने जनतेचे आधारस्तंभ ठरत आहेत.



- **'मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजने'तून तिवरे, निरबाडे, वालोटी, किरडुवे व फणसवले ग्रामपंचायत इमारतींसाठी १ कोटींचा निधी मंजूर**

## बार्शी कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीत बाळराजे गाटे यांचा अर्ज दाखल

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी आज ग्रामपंचायत मतदार संघातून माजी सरपंच बाळराजे गाटे यांनी राऊत गटातर्फे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या वेळी गाटे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या निवडणुकीला ग्रामपंचायत मतदार संघात विशेष महत्व आहे, कारण राऊत गटाचे येथे लक्षणीय प्राबल्य आहे. अर्ज दाखल करताना वैराग भागाचे नेते संतोषदादा निंबाळकर, बाबासाहेब कापसे, पप्पू टेकाळे, नानासाहेब धायगुडे, रमेश बापू सातपुते, गाढवे सर, सचिन बुरगुटे, रणजीत महानवर, संतोष पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

अर्ज दाखल केल्यानंतर बोलताना बाळराजे गाटे म्हणाले, "आमदार राजाभाऊ राऊत यांनी दाखवलेला विश्वास माझ्यासाठी मोठा सन्मान आहे. मी त्यांच्या सांगितलेल्या धोरणानुसारच काम करणार आहे. राजाभाऊ राऊत हे जे काही निर्णय घेतील, तो मला पूर्णपणे मान्य असेल."



ग्रामपंचायत विविध पातळ्यांवर गाटे यांनी गावाच्या विकासासाठी काम केले आहे. त्यांची ओळख एक प्रामाणिक, कार्यक्षम आणि लोकांमध्ये मिसळणारे नेते म्हणून आहे. दहा वर्षापासून सारोळे ग्रामपंचायतवर त्यांची सत्ता आहे.

युवा वर्गात गाटे यांची मोठी लोकप्रियता असल्याने त्यांना उमेदवारी मिळाल्यास तरुण पिढीत चांगला संदेश जाईल, असे स्थानिक कार्यकर्त्यांचे मत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून गाटे परिवाराने आमदार राऊत यांच्याशी निष्ठा आणि एकनिष्ठता जपली आहे. प्रत्येक निवडणुकीत त्यांनी राऊत गटासाठी सक्रिय काम केले असून, विधानसभा निवडणुकीत तालुक्यात दुसऱ्या क्रमांकाचे लीड मिळवून देण्यात त्यांचा मोठा वाटा होता. या सर्व पार्श्वभूमीवर माजी आमदार राजाभाऊ राऊत आगामी निवडणुकीत गाटे यांच्या उमेदवारीबाबत सकारात्मक विचार करतील, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे

ग्रामपंचायत मतदार संघात यामुळे कार्यकर्त्यांमध्ये चांगला उत्साह आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### पुण्याच्या उद्योजकांसाठी जागतिक संधींचे व्यासपीठ

**पुणे (आरंभ पर्व) : GMBF Global या दुबईस्थित आंतरराष्ट्रीय व्यावसायिक संस्थेच्या वतीने होणाऱ्या महाबिझ २०२६ या जागतिक व्यावसायिक अधिवेशनाचा पुण्यासाठी विशेष महत्त्वाचा टप्पा म्हणून विचार केला जात आहे. या विशेष पत्रकार परिषदेला 'गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरम'(जी एम बी एफ) ग्लोबल दुबई युएईचे अध्यक्ष डॉ. सुनील मांजारेकर*, श्री विवेक कोल्हटकर(महासचिव, जीएमबीएफ ग्लोबल, दुबई), श्री नितिन सास्तकर (आयोजन सचिव, जीएमबीएफ ग्लोबल, दुबई), श्री अशोक सावंत (मीडिया डिरेक्टर - जीएमबीएफ ग्लोबल, दुबई), श्री. दिलीप खेड़ेकर(मीडिया और संचार, जीएमबीएफ ग्लोबल (इंडिया), श्री देवा सोळंकी, श्री. जितेंद्र जोशी इत्यादी मान्यवर या पत्रकार परिषदेस उपस्थित होते.**

### गंगाधर भडावळे यांची कर्तव्यदक्षता; नागरिकांच्या समस्येवर उपाय



**धायरी (आरंभ पर्व) : धायरीतील मानस सोसायटीत धोकादायक झाडं कोसळण्याच्या भीतीमुळे नागरिक काही दिवसांपासून त्रस्त होते. पावसाळ्याच्या दिवसांत ही झाडं पडून अपघात होण्याची शक्यता होती. ही बाब लक्षात आल्यानंतर माजी स्वीकृत नगरसेवक गंगाधर भडावळे यांनी तात्काळ प्रतिसाद दिला. त्यांनी स्वतः जागेवर जाऊन पाहणी केली आणि पुणे महानगरपालिकेच्या मदतीने झाडांची सफाई करून घेतली. काम सुरू असतानाही भडावळे स्वतः उपस्थित राहून संपूर्ण कामावर लक्ष ठेवत होते. त्यांच्या या कर्तव्यदक्ष आणि तत्पर वृत्तीमुळे नागरिकांनी कौतुक व्यक्त केला. याचबरोबर त्यांनी सिंहगड रोडवरील ड्रेनेज लाईन दुरुस्तीचं कामही मनापासून पूर्ण करून घेतलं. त्यामुळे परिसरातील पाणी साचण्याचा आणि दुर्गंधीचा प्रश्न सुटला. या कामातून भडावळे यांनी कर्तव्यदक्षपणा, संवेदनशीलता आणि जनतेप्रती असलेलं प्रेम पुन्हा एकदा दिसून आलं. त्यामुळे त्यांच्या कार्याचे कौतुक नागरिकांना वाटत आहे.**

## वर्षभर बाळांची मालिश : व्हर्जिन खोबरेल तेल प्रत्येक ऋतूत का उपयुक्त?

डॉ. शिल्पा व्होरा, मुख्य संशोधन आणि विकास अधिकारी, मॅरिको लिमिटेड व तज्ञ, पॅराशूट अॅडव्हान्स्ड बेबी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय संस्कृतीत बाळांची मालिश ही फक्त दिनचर्या नसून एक जपलेली परंपरा आहे. पिढ्यान्पिढ्या चालत आलेली ही सवय बाळाच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी अत्यंत उपयुक्त मानली जाते. सौम्य मालिशमुळे रक्ताभिसरण सुधारते, हाडे सशक्त बनतात, पचनक्रिया सुलभ होते आणि झोपेची गुणवत्ता वाढते. शिवाय, या प्रक्रियेद्वारे पालक आणि बाळामध्ये एक गहिरे नाते तयार होते.

मात्र ऋतुबदलासोबत बाळाच्या त्वचेची गरजही बदलते. याच पार्श्वभूमीवर व्हर्जिन खोबरेल तेल हे



सर्व ऋतूंमध्ये उपयुक्त ठरणारे नैसर्गिक उपाय मानले जाते. पॅराशूट अॅडव्हान्स्ड बेबी मसाज ऑइल हे १००% नैसर्गिक व्हर्जिन खोबरेल तेलापासून तयार केलेले असून, यात व्हिटॅमिन ई आणि एफ मुबलक प्रमाणात आढळतात.

हे तेल नवजात बाळांसाठी वैद्यकीयदृष्ट्या सुरक्षित असल्याचे प्रमाणित झाले असून, वजन व उंची वाढविणे, हाडे मजबूत करणे आणि त्वचेचे पोषण करणे या तिन्ही बाबतींत प्रभावी ठरले आहे.

यात पॅराबेन्स, सल्फेट्स, सिलिकॉन, कृत्रिम रंग, खनिज तेल किंवा थलेट्स नसतात — त्यामुळे ते बाळाच्या नाजूक त्वचेसाठी अत्यंत सुरक्षित आहे.

डॉ. शिल्पा व्होरा सांगतात, "नवजात बाळाची त्वचा प्रौढांपेक्षा सुमारे ३०% पातळ असते, त्यामुळे ती सहज कोरडी पडू शकते. अशा वेळी तिला सौम्य पण प्रभावी पोषणाची गरज असते, आणि व्हर्जिन खोबरेल तेल हे यासाठी उत्तम पर्याय आहे."

उन्हाळ्यात थंडावा देणे आणि पुरळ टाळणे, हिवाळ्यात त्वचेचा कोरडेपणा कमी करणे आणि पावसाळ्यात संसर्गापासून संरक्षण देणे — या सगळ्या ऋतूंमध्ये व्हर्जिन खोबरेल तेल आपली भूमिका उत्तमरीत्या पार पाडते.

बाळाच्या आरोग्यासाठी आणि आनंदी वाढीसाठी पालकांनी वर्षभर वापरता येईल असा हा सौम्य, नैसर्गिक आणि विश्वासार्ह साथीदार निवडावा — म्हणजेच पॅराशूट अॅडव्हान्स्ड बेबी मसाज ऑइल.

## GHV इन्फ्रा प्रोजेक्ट्सची दुसऱ्या तिमाहीत दमदार झेप

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

GHV इन्फ्रा प्रोजेक्ट्स लिमिटेड (BSE-505504) या इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने आर्थिक वर्ष 2025-26 च्या दुसऱ्या तिमाहीतील अनऑडिटेड आर्थिक निकाल जाहीर केले आहेत. कंपनीने या तिमाहीत 128 टक्क्यांनी आवक वाढ आणि 138 टक्क्यांनी नफ्यात वाढ नोंदवत दमदार कामगिरी केली आहे.

आर्थिक ठळक बाबी

एकूण ऑपरेशनल आवक: ₹8,046 लाखांवरून वाढून ₹18,376.60 लाख

करापूर्वीचा नफा (PBT): 151% वाढून ₹632.16 लाखांवरून ₹1,584.73 लाख

करानंतरचा नफा (PAT): 138% वाढून ₹471.85 लाखांवरून ₹1,122.20 लाख

प्रति शेअर कमाई (EPS): तिमाहीसाठी ₹1.56 आणि पहिल्या सहामाहीसाठी ₹2.21

एकूण मालमत्ता: ₹51,232.44 लाख (30 सप्टेंबर 2025 पर्यंत)

कंपनीच्या कामगिरीला चालना देणाऱ्या काही महत्त्वाच्या निर्णयांमध्ये 3:2 बोनस शेअर इश्यू, इक्विटी शेअर स्प्लिट आणि प्रमोटर तसेच नॉन-प्रमोटर गटांना प्रेफरेंशियल अलॉटमेंट यांचा समावेश आहे.

## जरांगे पाटील यांच्या हत्येच्या कटाचा खुलासा!

### अडीच कोटींची सुपारी उघड



**जालना (दै. आरंभ पर्व)**

मराठा आरक्षण चळवळीचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा एक खळबळजनक कट उघडकीस आला आहे. जरांगे पाटलांना जिवे मारण्यासाठी तब्बल अडीच कोटी रुपयांची सुपारी देण्यात आल्याचा गंभीर दावा समोर आला आहे.

या प्रकरणी पोलिसांनी त्वरित कारवाई करत दोन संशयितांना अटक केली आहे. जरांगे पाटलांचे जुने सहकारी अमोल खुने आणि दादा गरूड यांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून, त्यांच्याकडून चौकशी सुरू आहे. हा कट उघडकीस येण्यासाठी जरांगे पाटलांचे आणखी एक सहकारी गंगाधर काळकुटे यांनी दाखल केलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी तात्काळ कारवाई केली. काळकुटे यांच्या सतर्कतेमुळे हा मोठा अनर्थ टळल्याचे सांगण्यात येत आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू असून, कटामागील मुख्य सूत्रधार आणि आर्थिक व्यवहारांचा मागोवा घेण्याचे प्रयत्न सुरु आहेत. पोलिसांकडून लवकरच या प्रकरणात अधिक खुलासे होण्याची शक्यता आहे.

## "मनाच्या श्लोकांवर आधारित जागतिक स्पर्धा"

### अभिनेत्री व लेखिका अनुराधा राजाध्यक्ष यांची उपक्रमशील संकल्पना जगभरात लोकप्रिय

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

अभिनेत्री, लेखिका आणि समाजसंवेदनशील व्यक्तिमत्व म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अनुराधा राजाध्यक्ष यांनी आयोजित केलेली "मनाचा श्लोक – जागतिक स्पर्धा" यंदा आपल्या तिसऱ्या वर्षात पदार्पण करत आहे. ही स्पर्धा सर्व वयोगटांसाठी खुली असून, सहभागी होण्यासाठी प्रवेश पूर्णपणे विनामूल्य ठेवण्यात आला आहे.

स्पर्धा ऑनलाइन पद्धतीने होत असून, १५ नोव्हेंबर पर्यंत स्पर्धकांना आपले प्रवेश पाठवता येतील. सहभागी होण्यासाठी कोणत्याही वयाचे बंधन नाही – सहा वर्षांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत कोणीही यात भाग घेऊ शकतो. मागील वर्षी या स्पर्धेत ९२ वर्षांच्या गृहस्थांनी सहभाग घेतला होता, हे विशेष.

सहभागी होण्यासाठी स्पर्धकांनी आपले नाव, राहते गाव, वय आणि मोबाईल क्रमांक ही माहिती ९०८२६०९६५४ या क्रमांकावर व्हॉट्सअॅप संदेशाद्वारे पाठवायची आहे. त्यानंतर त्यांना स्पर्धेची संपूर्ण माहिती तसेच मार्गदर्शक व्हिडिओ आणि लिंक पाठवली जाईल.

**स्पर्धेचा हेतू आणि स्वरूप :** या स्पर्धेचा उद्देश म्हणजे 'मनाचा एक श्लोक' निवडून त्याचा आजच्या काळाशी आणि व्यक्तीच्या जीवनाशी असलेला संबंध मांडणे. स्पर्धकांनी निवडलेला श्लोक एक ते पाच मिनिटांच्या व्हिडिओद्वारे सादर करायचा आहे. त्या




श्लोकाचा अर्थ आणि त्याची आजच्या वास्तवातली सुसंगती आपल्या शब्दांत सांगायची आहे.

या माध्यमातून केवळ श्लोकपठण नव्हे, तर त्यामागचा आध्यात्मिक आणि सामाजिक अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न प्रोत्साहित केला जातो.

**जागतिक प्रतिसाद :** मागील वर्षी या स्पर्धेला जगभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, सौदी अरेबिया तसेच भारताच्या कानाकोपऱ्यातून हजारो स्पर्धकांनी भाग घेतला होता. या वर्षीही स्पर्धा तितक्याच उत्साहात पार पडत आहे.

**पारितोषिके व सन्मान :** प्रत्येक वयोगटात तीन रोख पारितोषिके दिली जातील.

तसेच प्रत्येक व्हिडिओ पाठवणाऱ्या स्पर्धकाला डिजिटल प्रमाणपत्र

सर्वाधिक लोकप्रिय व्हिडिओसाठी विशेष पारितोषिक सर्वाधिक स्पर्धक असणाऱ्या संस्थेला सन्मानचिन्ह असे अनेक सन्मान या स्पर्धेत दिले जाणार आहेत.

**विशेष गट – गतिमंद व ऑटिस्टिक स्पर्धकांसाठी**

या स्पर्धेचे सर्वात अनोखे वैशिष्ट्य म्हणजे – ऑटिस्टिक आणि गतिमंद व्यक्तींसाठी स्वतंत्र गट व पारितोषिके राखण्यात आली आहेत.

अशा स्पर्धकांनी आपल्या मेसेजमध्ये "स्पर्धक गतिमंद अथवा ऑटिस्टिक आहे" हे नमूद करून सहभागी होता येते. त्यांच्याकडून फक्त मनाचा एक श्लोक म्हणावा एवढीच अपेक्षा ठेवली गेली आहे.

### सहभागासाठी

**व्हॉट्सअॅप नंबर: ९०८२६०९६५४**
**माहिती पाठवताना लिहा: नाव, राहते गाव, वय आणि मोबाईल नंबर**
**व्हिडिओ पाठवण्याची अंतिम तारीख: १५ नोव्हेंबर २०२५**
**व्हिडिओ कालावधी: १ ते ५ मिनिटे**



**अनुराधा राजाध्यक्ष यांच्या या उपक्रमाने "मनाचे श्लोक" हे केवळ धार्मिक पठण न राहता, जीवनाशी जोडलेली एक प्रेरणादायी अनुभूती बनवली आहे. या स्पर्धेद्वारे जगभरातील मराठी भाषिकांना एकत्र आणत आध्यात्मिकता आणि सामाजिक जागृतीचा अनोखा संगम घडवून आणला जात आहे.**




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शनिवार, दि. ०८ नोव्हेंबर २०२५













# खासदार चषक क्रिकेट स्पर्धेत रंगत आहेत रोमांचक सामने

**लक्ष्मण साबळे**

## क्रीडा प्रेमींनी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे मानले आभार!!!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मा. श्री. मुरलीधर मोहोळ यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या खासदार चषक क्रिकेट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

व्हिजन ग्राउंड, सनसिटी रोड, आनंदनगर, सिंहगड रोड येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत आजही अतिशय उत्कंठावर्धक सामने रंगले. प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या गजरात खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करत मैदान गाजवले.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी निमंत्रक विशाल उभे, तसेच खडकवासला विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे पदाधिकारी आणि सर्व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. खेळाडूंसाठी योग्य सुविधा, शिस्तबद्ध आयोजन आणि आकर्षक वातावरण यामुळे स्पर्धेचे स्वरूप अधिक भव्य झाले आहे.

दररोज होणाऱ्या सामन्यांमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षणाचे कौशल्य दाखवले असून, प्रत्येक सामना नवे उत्साहाचे वातावरण निर्माण करत आहे. त्यामुळे संपूर्ण परिसरात क्रीडामहोत्सवाचे वातावरण निर्माण झाले आहे.



या स्पर्धेच्या निमित्ताने क्रीडाप्रेमी नागरिक, युवक आणि स्थानिक संघटनांमध्ये एकतेची भावना अधिक दृढ झाली आहे. उपस्थित खेळाडूंनी व संघ व्यवस्थापकांनी या उत्तम आयोजनाबद्दल आयोजक मंडळाचे आभार मानले.

दिनांक 2 नोव्हेंबर ते 16 नोव्हेंबर या कालावधीत ही स्पर्धा पार पडणार असून, विजेत्या संघाला "खासदार चषक" प्रदान केला जाणार आहे.

क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या आवडत्या संघांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

याचे लाईव्ह टेलिकास्ट होत असल्याने क्रीडाप्रेमींना चांगलाच उत्साह संचारला आहे.

> ठिकाण: व्हिजन ग्राउंड, सनसिटी रोड, आनंदनगर, सिंहगड रोड
> कालावधी: 2 नोव्हेंबर ते 16 नोव्हेंबर
> आयोजक: मा. श्री. मुरलीधर अ मोहोळ, केंद्रीय राज्य मंत्री
> सहयोग: आमदार भीमराव तापकीर, निमंत्रक ,विशाल उभे, खडकवासला भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते

## थोडक्यात पण महत्वाचे



### प्रयेजा सिटी ते सिरीन कौंटी दरम्यानच्या रस्त्याच्या दुरुस्तीला सुरुवात

धायरी (आरंभ पर्व) : प्रयेजा सिटी ते सिरीन कौंटी दरम्यानच्या खराब रस्त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर अडचणींचा सामना करावा लागत होता. काही दिवसांपूर्वी मनपा अधिकाऱ्यांसह या रस्त्याची पाहणी करून तातडीने दुरुस्तीची मागणी करण्यात आली होती. खडकवासला भाजप युवा मोर्चाचे माजी अध्यक्ष युवा नेते सारंग नवले यांनी या संदर्भात सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून आज या रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली असून सारंग नवले यांच्या हस्ते कामाचे उद्घाटन करण्यात आले. नागरिकांना या रस्त्यामुळे दररोज त्रास सहन करावा लागत होता. पावसाळ्यात खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका आणि पाण्याचे डबके निर्माण होत होते. या पार्श्वभूमीवर सारंग नवले यांनी मनपाशी वारंवार पाठपुरावा करून तातडीने काम सुरू करण्याची मागणी केली होती. आज दुरुस्तीला सुरुवात झाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून "दीर्घकाळानंतर आमच्या मागणीला न्याय मिळाला" असे मत मांडले. या भागातील रस्ता लवकरच पुन्हा सुरक्षित आणि सुलभ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.



## श्रावण एस. तायडे सर यांचा राष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बुधवार दि. 5 नोव्हेंबर 2025 : आंतरराष्ट्रीय नामांकन (आय एस ओ 2015) प्राप्त डिजिटल प्रेस क्लब ऑफ इंडिया द्वारा आयोजित भव्य सोहळ्यामधे श्रावण एस.तायडे सर यांना 'राष्ट्र गौरव पुरस्कार 2025' प्रदान करण्यात आला.

स्वतः हालाखीच्या परिस्थिती मधे त्याकाळात M.A., M. Ed पर्यंत शिक्षण पूर्ण करून ग्रामीण भागातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणे, शिक्षण क्षेत्रात अभुतपूर्व कामगिरी व सामाजिक कार्य, जनसामान्याच्या अडचणींची जाणीव ठेवून त्या पूर्ण करण्याची धडपड या उल्लेखनीय कार्यासाठी श्रावण एस.तायडे सर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. भातृ मंडळ हॉलमध्ये सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## खेळ रंगला पैठणीचा ! वडगाव बु. येथे महिला उत्साहाचा जल्लोष



**वडगाव बु. (दै. आरंभ पर्व)**

"खेळ रंगला पैठणीचा!" — या घोषवाक्यासह वडगाव बु. येथे महिलांसाठी आयोजित खेळ, स्पर्धा आणि बक्षीस वितरण समारंभ अतिशय उत्साहात पार पडला.

कै. चंद्रकांत यशवंत दांगट चौकात भरलेला हा कार्यक्रम महिलांच्या आनंद, हशा आणि उत्साहाने गजबजून गेला.

या कार्यक्रमाचे आयोजन माजी नगरसेवक श्री. हरिदास कृष्णा चरवड यांनी केले होते. त्यांच्या पुढाकाराने वडगाव बु. परिसरात महिलांसाठी आनंद आणि संस्कृतीचा सुंदर संगम घडवून आणला. कार्यक्रमात गौरी-गणपती सजावट स्पर्धा, 'होम मिनिस्टर' खेळ, आणि 'पैठणी' स्पर्धा या तिन्ही उपक्रमांनी महिलांचा उत्साह उंचावला. पारंपरिक पोशाख, विनोदी प्रश्नोत्तरे, आणि हसऱ्या वातावरणामुळे कार्यक्रम रंगतदार झाला. विजेत्यांचा गौरव राज्यमंत्री श्रीमती माधुरीताई मिसाळ (राज्यमंत्री, नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, सह-पालकमंत्री, कोल्हापूर) आणि कार्यसम्राट आमदार मा. भिमराव आण्णा तापकीर (खडकवासला मतदारसंघ) यांच्या हस्ते करण्यात आला.

बक्षीस वितरणावेळी परिसरात टाळ्यांचा गजर झाला, तर विजेत्या महिलांना आकर्षक पैठणी आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ म्हणाल्या, "महिला समाजाचा आधारस्तंभ आहेत. अशा उपक्रमांतून त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि प्रत्येक घरात आनंदाचे वातावरण निर्माण होते."

आमदार भिमराव तापकीर यांनी सांगितले, "वडगाव बु. नेहमीच सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात अग्रेसर राहिले आहे. महिलांचा सहभाग म्हणजे समाजाच्या प्रगतीचे प्रतीक आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिकांनी एकदिलाने परिश्रम घेतले. शेवटी स्नेहसंमेलन आणि मनोरंजनात्मक खेळांद्वारे कार्यक्रमाचा समारोप झाला.




# धायरी-वडगाव परिसरातील दमिष्टे कुटुंब चर्चेत

## सुरेखाताई दमिष्टे (पोकळे) यांच्याकडे प्रभाग ३४ मधून मोठ्या अपेक्षा

**मिशन महानगरपालिका**
**प्रभाग क्रमांक ३४**





**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी, वडगाव आणि नऱ्हे परिसरात सामाजिक, शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेले दमिष्टे कुटुंब पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे. नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर उपाय शोधणाऱ्या या कुटुंबाने परिसरात एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे.

सुरेखाताई दमिष्टे (पोकळे) या माजी जिल्हा परिषद सदस्या आणि प्रथम महिला सरपंच म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी राबवलेल्या विकासकामांमुळे नागरिकांमध्ये आजही त्यांचा चांगला विश्वास आहे. त्यांनी रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि महिलांसाठीचे उपक्रम अशा अनेक क्षेत्रांत काम केले आहे.

त्यांचे माहेर पोकळे कुटुंब धायरीतील प्रतिष्ठित कुटुंब असून, आजोळ कुंभारकर (वडगाव) यांच्याशीही त्यांचे घट्ट कौटुंबिक संबंध आहेत. या नातेसंबंधांमुळे दमिष्टे कुटुंबाचा परिसरातील समाजाशी घनिष्ठ संपर्क कायम आहे.

निलेश दमिष्टे हे स्वतः क्रिकेटप्रेमी आणि उत्साही खेळाडू असून, त्यांनी अनेकदा क्रिकेट स्पर्धांचे आयोजन तसेच स्पॉन्सरशिप दिली आहे. त्यामुळे स्थानिक तरुणांमध्ये त्यांच्याबद्दल आदर आणि जिव्हाळा आहे.

व्हाट्स अँप व फेसबुकसारख्या सोशल मीडियावरून नागरिकांच्या समस्या मांडून त्या सोडवण्यासाठी दमिष्टे कुटुंब सातत्याने प्रयत्नशील असते. त्यांच्या या जनसंपर्कप्रधान आणि लोकाभिमुख कार्यामुळे प्रभाग 34 मध्ये दमिष्टे परिवारातील एक उमेदवार या वेळी महापालिका निवडणुकीत बाजी मारेल, असा नागरिकांचा ठाम विश्वास आहे.

दैनिक आरंभपर्व पुणे ने मिशन महानगरपालिका सदरामध्ये सुरेखाताई दमिष्टे यांच्याशी संवाद साधला असता त्या म्हणाल्या –

"आमचं ध्येय केवळ निवडणूक जिंकण्यापुरतं नाही, तर प्रभागाचा सर्वांगीण विकास घडवणं आहे. आम्ही खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत असून, नागरिकांच्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्याचा आमचा प्रयत्न असेल. परिसरातील प्रत्येक व्यक्तीला चांगल्या सुविधा मिळाव्यात, हा आमचा हेतू आहे."

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, "दमिष्टे ताईंबद्दल परिसरात प्रचंड अपेक्षा आहेत. त्यांच्या कामाचा अनुभव आणि जमिनीशी असलेला संपर्क पाहता, त्यांच्याकडून विकासाची नवी दिशा मिळेल," असे मत अनेकांनी व्यक्त केले.

धायरी पुन्हा सोन्याची पायरी म्हणत प्रभागाच्या विकासाचा नवा अजेंडा यांनी निर्माण केला आहे..

शरदचंद्र पवार साहेब यांची निष्ठेने दिलेली साथ, प्रशासकीय कामाचा अनुभव असल्यामुळे सुरेखाताई यांचे तिकीट जवळपास असल्याचे सिद्ध होते.

धायरी, नऱ्हे आणि वडगाव परिसरात "दमिष्टे" हे नाव आज सामाजिक कार्य, विकास आणि जनसेवा यांचं प्रतीक बनलं आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### धनंजय पाटील युवा मंचतर्फे बैठका स्पर्धा; साई रायकर ठरला विजेता

- १४० युवकांचा सहभाग, १४१६ बैठका मारून साई रायकरचा विक्रम

पुणे (आरंभ पर्व) : वडगांव बुद्रुक येथील ओम साई हेल्थ क्लब येथे धनंजय पाटील युवा मंच यांच्या वतीने आयोजित बैठका स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत तब्बल १४० युवकांनी सहभाग घेत आपली शारीरिक क्षमता आणि सहनशक्तीची झुंज दिली. स्पर्धेत सहभागी युवकांनी ४५ मिनिटांच्या वेळेत ४५८ ते तब्बल १४१६ इतक्या बैठका मारत दमदार कामगिरी केली. यामध्ये साई रायकरने १४१६ बैठका मारून सर्वाधिक गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे खजिनदार अभय छाजेड, सरचिटणीस श्रीरंग नाना चव्हाण पाटील, बारामती लोकसभा अध्यक्ष लहू अण्णा निवंगुणे, कॉसमॉस बँकेचे संचालक मिलिंद पोकळे, सामाजिक कार्यकर्ते कुलदीप चरवड, किसान काँग्रेस अध्यक्ष शंकरराव दांगट, उद्योजक प्रदीप खेडेकर, किशोर रायकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन पुणे शहर काँग्रेस कमिटी पर्यावरण विभागाचे उपाध्यक्ष धनंजय पाटील यांनी केले. सूत्रसंचालन धनंजय पवार यांनी केले तर आभार अनिकेत देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाचे संयोजन दीपक कुदळे, प्रफुल्ल मोरे, मारुती पवार, संजय पाटील, दीपक लोंढे, विजय गावंडे, विपुल साठे, अंबादास बिरादार, तुकाराम पासलकर, रामा शिंदे, राहुल ढोरजे, सुनील सळेकर, समीर पवळे, अक्षय सानानसे, सर्वेश चोरघडे, समीर शेडे, रोहित मौर्य, शुभम निकम, महेश शिंदे, हर्षल पाटील, तुषार तनपुरे, हर्षल पाटील यांनी केले.

### लोकमान्यनगर पुनर्विकासावर संताप

पुणे (आरंभ पर्व) : लोकमान्यनगर परिसरातील सावली सहकारी गृहनिर्माण सोसायटी आणि स्थानिक रहिवाशी डॉ. मदन मोहन कोठुळे यांनी त्यांच्या जीर्ण इमारतींच्या पुनर्विकासावर लादण्यात आलेल्या स्थगितीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ४० वर्षांहून अधिक जुनी आणि धोकादायक इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांनी शासन आणि म्हाडा प्रशासनावर निष्क्रियतेचे आरोप केले आहेत. या पार्श्वभूमीवर सावली सोसायटीने डॉ. कोठुळे यांच्या माध्यमातून वकिलांमार्फत (ॲड. रणजित गवारे आणि ॲड. भाग्यश्री बेलकर) मुख्यमंत्री, पुणे जिल्हाधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण महामंडळ आणि पुणे महानगरपालिका यांना कायदेशीर नोटीस दिली आहे. या नोटिसीत म्हटले आहे की, "इमारती अत्यंत जीर्णावस्थेत असून रहिवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तरीदेखील लोकमान्यनगर परिसरात क्लस्टर डेव्हलपमेंटच्या नावाखाली सर्व पुनर्विकास प्रकल्पांवर ब्लँकेट स्थगिती लावणे अन्यायकारक आहे." नोटिसीनुसार, सावली सोसायटीची इमारत ४० वर्षांहून अधिक जुनी आणि पुनर्विकासासाठी ठराव सभेत मंजूर करण्यात आला आहे. मात्र, स्थानिक आमदार हेमंत रासने यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून "सर्व इमारतींचा एकत्रित क्लस्टर डेव्हलपमेंट प्रकल्प राबवावा" अशी मागणी केली, ज्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर शासनाने सर्व पुनर्विकास प्रकल्पांवर स्थगिती लागू केली.

दैनिक आरंभपर्व
साप्ताहिक संपादकांसाठी
खास ऑफर
१ महिन्याचे ४ अंक (४ पानी)
फक्त ₹८,000/-
(पहिल्या ५ लोकांसाठी खास ऑफर !)
नंतरचे शुल्क (४ पाने – ४ अंक)
₹ १२,000
प्रिंटींगची सोय उपलब्ध (अतिरिक्त शुल्क आकारले जाईल)
मर्यादित कालावधीसाठीच ही ऑफर लागू आहे.
आजच तुमच्या साप्ताहिकासाठी सुवर्णसंधीचा लाभ घ्या!
संपर्क: प्रतिक गंगणे ७२७६३१४१४२/८६५७८६५७०२

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
वार्ताहर नेमणे आहे
पुणे आणि जिल्ह्यात लोकप्रिय दै.आरंभ पर्वसाठी खालीलप्रमाणे जिल्हा व तालुकास्तरावर वार्ताहर नेमणे आहेत.
सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व आरंभपर्व
पुणे जिल्हा
इंदापूर शहर, इंदापूर ग्रामीण, बारामती, उरुळी कांचन, यवत, केडगाव, सुपा, भिगवण, सासवड, पुरंदर,जेजुरी, नीरा, सोमेश्वर, माळेगाव, भोर, वेल्हा. चाकण, राजगुरूनगर, मंचर, जुन्नर, घोडेगाव, लोणी काळभोर
पुणे शहर
धायरी, स्वारगेट, हडपसर, कॅम्प, वडगाव बुद्रुक, पर्वती, डेक्कन, सिंहगड रोड, कात्रज, कोंढवा
इच्छुकांनी आपला बायोडाटा खालील ई-मेल वर पाठवावा.
aparvinfo@gmail.com
वार्ताहरांना मिळणाऱ्या सुविधा
आयडीकार्ड, नियुक्तीपत्र, युट्युबसाठी लागणारा माईक
(टीप - वरील गोष्टी देण्यापूर्वी किमान एक महिने काम करणे आवश्यक. आपले काम बघून पुढील निर्णय घेतला जाईल.)
दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272

## प्रभाग क्रमांक ३३ मध्ये प्रमुख पक्षांत तुल्यबळ दावेदार; भाजपत सर्वाधिक इच्छुक, मतविभाजनाचे समीकरण गुंतागुंतीचे

# मतविभाजनाचा फायदा कोणाला?

**सौ. सुरेखा मते - संपादिका**

- शिवणे-खडकवासला प्रभागात इच्छुकांची भाऊगर्दी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महापालिकेतील नव्याने समाविष्ट झालेल्या शिवणे–खडकवासला–धायरी (पार्ट) या प्रभाग क्रमांक ३३ मध्ये निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रभागात समाविष्ट असलेल्या गावांमुळे मतदारसंख्येत मोठी वाढ झाली असून प्रमुख पक्षांत तुल्यबळ दावेदारांची गर्दी निर्माण झाली आहे. त्यामुळे मतविभाजनाचे समीकरण गुंतागुंतीचे बनले असून, या विभागात कोणाचा पलडा जड ठरणार याबाबत उत्सुकता वाढली आहे.

**प्रभागाचा विस्तार आणि मतदारसंख्या**

या प्रभागात शिवणे, खडकवासला, नांदेड, किरकटवाडी, नांदोशी, सणसनगर, कोंढवे धावडे, उत्तमनगर, कोपरे आणि उर्वरित धायरी या भागांचा समावेश आहे.

एकूण ८७,८१४ मतदारसंख्या असलेल्या या प्रभागाचा भूभाग विस्तृत असल्याने प्रचार मोहिमेत उमेदवारांची दमछाक होणार हे स्पष्ट आहे. ग्रामीण आणि निमशहरी अशा दोन्ही स्वरूपाचा हा भाग असल्याने मतदारांचे मुद्देही वेगवेगळे आहेत - काही ठिकाणी पाणीपुरवठा, रस्ते आणि मूलभूत सुविधा तर काही ठिकाणी नागरी नियोजन, वाहतूक आणि विकासाचा प्रश्न आघाडीवर आहे.

**भाजपत इच्छुकांची सर्वाधिक संख्या**

या प्रभागात भाजपकडून इच्छुकांची संख्या सर्वाधिक आहे. माजी नगरसेविका अश्विनी पोकळे यांच्या विजयानंतर भाजपने या भागात मजबूत पाय रोवले आहेत.

यावेळी संदीपभाऊ पोकळे, किशोर पोकळे,बापूसाहेब पोकळे, रूपेश घुले पाटील, रश्मी घुले पाटील, दत्तात्रय कोल्हे, धनश्री कोल्हे, सुभाष नाणेकर, किरण व काजल हगवणे, अनिल मते, संतोषदादा मते, रमेशबापू गायकवाड, मनीषा मोरे, निखिल धावडे, गणेश वांजळे, संकेत जाधव असे अनेक इच्छुक तयारीत आहेत.

अनुसूचित जाती आरक्षण पडल्यास फुलाबाई कदम, सायली भोसले आणि अभिषेक कांबळे हे भाजपकडून संभाव्य उमेदवार ठरू शकतात.

भाजपात सध्या प्रमुख चर्चा अशी आहे की, 'ऐनवेळी पक्षात आलेल्यांना उमेदवारी देऊ नये', अन्यथा नाराजीचा फटका बसू शकतो.

काँग्रेसकडून मिलिंद पोकळे, अतुल कारले, उमेश कोकरे हे दावेदार आहेत.

मनसेकडून विजय मते, शिवाजीराव मते, सोनाली पोकळे, विजय इंगळे, रमेश करंजावणे, जगदीश वाल्हेकर, महादेव मते आणि अतुल मते ही नावे पुढे आली आहेत.

काही स्वतंत्र इच्छुक - नितीन धावडे, उमेश कारले, राहुल मते, संजय धिवार यांनीही प्रचारयंत्रणा सुरू केली असून, हे कोणत्या पक्षातून लढणार याबाबत अद्याप निश्चित झालेले नाही.

शिवणे–खडकवासला परिसर एकेकाळी राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात होता. मात्र मागील काही विधानसभांपासून भाजपने या भागात मजबुत पाय रोवले आहेत.

भाजपचे आमदार भीमराव तापकीर यांचा प्रभाव लक्षात घेता पक्षाकडे संघटनबळ आणि प्रचारयंत्रणा दोन्ही आहेत.

दुसरीकडे, राष्ट्रवादीचे दोन्ही गट मतदारांमध्ये विभागले जात असल्याने मतविभाजन निश्चित आहे.

> **शिवणे–खडकवासला प्रभागात भाजपकडे संघटनशक्ती आणि कार्यकर्त्यांचे जाळे आहे, तर राष्ट्रवादी शरद पवार गट व अजित पवार गट या दोघांकडे पारंपरिक मतदार आहेत. शिवसेना, काँग्रेस, मनसे आणि आप यांच्या प्रवेशामुळे प्रभागात चौरंगी नव्हे तर पंचरंगी लढत होण्याची शक्यता आहे. अशा स्थितीत मतदारसंघाचे "राजकीय गणित नव्याने लिहिले जाणार" हे निश्चित.**



> **शिवसेना आणि काँग्रेसकडे तुलनेने कमी बळ आहे, पण काही प्रभागांमध्ये स्थानिक स्तरावर त्यांचा प्रभाव आहे. अशा परिस्थितीत मतविभाजनाचा थेट फायदा भाजपला होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे. महायुती आणि महाविकास आघाडी एकत्र लढणार की वेगवेगळे, याबाबत अजून स्पष्टता नाही. पण सर्वच पक्षातील इच्छुकांनी "लढायचेच" असा पवित्रा घेतल्याने मतांचे तुकडे होण्याची शक्यता वाढली आहे. जर गठबंधन झाले, तर प्रबळ उमेदवार असलेल्या गटाला फायदा होईल. पण बहुपक्षीय स्पर्धा झाली, तर मतविभाजनामुळे निकाल अनपेक्षित वळण घेऊ शकतो.**

### राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)

**अजित पवार गटाकडून शुक्राचार्य वांजळे (माजी उपाध्यक्ष, जिल्हा परिषद), राहुल पोकळे, सौरभ मते (माजी सरपंच, खडकवासला), सागर कोल्हे, विकास कामठे आणि अविनाश लगड या नावांचा उल्लेख जोरात आहे. या गटाकडे संघटनबळ असून, अजित पवार यांचे प्रभावक्षेत्र असल्याने स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आहे.**

### राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)

**दुसरीकडे शरद पवार गटाकडून माजी जि.प. सदस्या अनिता इंगळे, माजी नगरसेवक काकासाहेब चव्हाण आणि त्यांचे पुत्र अनिकेत चव्हाण हे आघाडीचे दावेदार आहेत. तसेच राहुल घुले पाटील, नरेंद्र हगवणे, माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेखा दमिष्टे, निलेश दमिष्टे,त्रिंबक मोकाशी, अतुल धावडे, स्नेहल धावडे, अतुल दांगट, पूनम मते, हनुमंत शिवर, तृप्ती पोकळे, कुणाल पोकळे आणि आनंद मते ही नावे चर्चेत आहेत. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालील या गटासमोर भाजपचा मजबूत गड भेदण्याचे आव्हान आहे.**

### शिवसेना आणि काँग्रेस गट

**शिवसेना (उद्धव ठाकरे गट) कडून बाळासाहेब मोकाशी (माजी सभापती, हवेली पंचायत समिती), गोकुळ करंजावणे (माजी सरपंच, किरकटवाडी), संदीप मते आणि दत्तानाना रायकर हे इच्छुक आहेत. तर शिवसेना (एकनाथ शिंदे गट) कडून राधिकाताई गिरमे, जगदीश धुमाळ आणि संतोष शेलार यांची नावे पुढे आली आहेत.**

## भगिनींसाठी संदीप पोकळे यांच्याकडून तीर्थयात्रेचे आयोजन

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक 33 धायरी खडकवासला शिवणे परिसरातील माता-भगिनींसाठी भक्ती आणि आनंदाचा संगम घडवणारा उपक्रम "मोफत तीर्थयात्रा फक्त महिलांसाठी" भाजपचे कार्यकर्ते श्री. संदीपभाऊ सुभाष पोकळे यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला आहे. हा उपक्रम विजडम विंग्स फाउंडेशन तर्फे राबवण्यात येत असून महिलांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधानाची लहर उमटवणारा ठरत आहे. या यात्रेत महाराष्ट्रातील प्रसिद्ध धार्मिक स्थळांचा समावेश आहे .कोल्हापूर , तुळजापूर, पंढरपूर , अक्कलकोट,आळंदी, शिखर शिंगणापूर अशी पवित्र स्थळे महिलांना दर्शनासाठी मिळणार आहेत. ही यात्रा पूर्णपणे मोफत असून प्रवासाची व्यवस्था बसने करण्यात आली आहे. सुरक्षित, सुखद आणि श्रद्धाभावाने परिपूर्ण अशा या प्रवासात सहभागी होण्यासाठी महिलांना आधारकार्ड आणि मतदान ओळखपत्रासह नावनोंदणी करावी लागणार आहे. एका व्यक्तीला एक यात्रेसाठी नोंदणी करता येईल. QR कोड स्कॅन करूनही नावनोंदणीची सोय करण्यात आली आहे. या उपक्रमाबाबत बोलताना संदीपभाऊ पोकळे म्हणाले, "आपल्या समाजातील माता-भगिनी घर, संसार आणि जबाबदाऱ्यांच्या ओझ्याखाली दबणाऱ्या या सर्व महिला भगिनींसाठी ही तीर्थयात्रा आयोजित केली आहे . मोठ्या संख्येने महिला भगिनी सहभागी होतील यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. हजारो महिलांना यानिमित्त तीर्थयात्रा घडविण्याचा मानस आहे. महिला भगिनींनी नोंदणी करण्यासाठी 7367027912, 7972297878, 8208171981 क्रमांकावर संपर्क साधावा असा आवाहन पोकळे यांनी केले आहे.

## धायरी व सिंहगड रोड परिसरात अस्वच्छता; आरोग्य संकट गंभीर

### तात्काळ कारवाईची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

धायरी व सिंहगड रोड परिसरात गेल्या अनेक महिन्यांपासून, वर्षानुवर्षे पाणी व कचऱ्याच्या भीषण अस्वच्छतेमुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. परिसरातील जवळपास प्रत्येक रस्त्यावर कचऱ्याचे ढीग साचले आहेत, ओढ्यांमध्ये, नाल्यांमध्ये आणि कॅनॉलमध्ये मोठ्या प्रमाणावर घाण व प्लास्टिक टाकण्यात आले आहे.

पिण्याच्या पाण्याच्या विहिरी व बोअरवेलजवळ साचलेला कचरा हा सार्वजनिक आरोग्यासाठी धोकादायक ठरत असून, त्यातून मच्छर, दुर्गंधी आणि संसर्गजन्य आजार पसरत आहेत. परिणामी डेंग्यू, टायफॉइड, त्वचारोग यांसारख्या आजारांचे प्रमाण परिसरात वाढताना दिसत आहे. मागील दोन वर्षांपासून स्थानिक नागरिक निलेश सुरेखा रमेश दमिष्टे हे या गंभीर समस्येबाबत सातत्याने सोशल मीडियाच्या माध्यमातून आवाज उठवत आहेत. त्यांनी अनेक वेळा संबंधित अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले असले, तरीही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

दिनांक १६ ऑक्टोबर २०२५ रोजी खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पुढाकाराने आयुक्त नवल किशोर राम यांना या समस्येबाबत खासदार सुप्रिया सुळे यांच्या लेटरहेडवरून अधिकृत निवेदन देण्यात आले होते. तरीदेखील अद्याप परिसरातील कचरा सफाईसाठी योग्य नियोजन करण्यात आलेले नाही, अशी खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे.

या दुर्लक्षाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत निलेश सुरेखा रमेश दमिष्टे यांनी इशारा दिला आहे की - "जर तातडीने या समस्येवर उपाययोजना करून कचरा हटविण्यात आला नाही, तर आम्ही १६ नोव्हेंबर २०२५ रोजी रास्ता रोको आंदोलन करून हा कचरा थेट जबाबदार अधिकारी वर्गाच्या दारात नेऊन टाकू. हा आमचा शांततामय पण ठाम निषेध असेल."

नागरिकांनी याला मोठा पाठिंबा दर्शविला असून, प्रशासनाने या आरोग्याच्या धोकादायक परिस्थितीकडे गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ स्वच्छता मोहीम राबवावी, अशी मागणी होत आहे.



## धायरी-शिवणे-खडकवासला परिसराचा 'आपला माणूस' - संदीपभाऊ पोकळे




**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी, शिवणे आणि खडकवासला परिसरात अनेक वर्षांपासून सातत्याने काम करत, लोकांच्या मनात स्थान मिळवलेले नाव म्हणजे संदीपभाऊ सुभाष पोकळे. सत्ता असो वा नसो, समाजासाठी आणि पक्षासाठी नेहमी तयार राहणारा हा नेता आज पुन्हा एकदा चर्चेत आहे.

संदीपभाऊंचा प्रवास हा केवळ राजकारणापुरता मर्यादित नाही, तर तो जनतेच्या सेवेला अर्पण केलेला आयुष्याचा प्रवास आहे. त्यांनी हवेली तालुकाध्यक्षपदापासून सुरुवात करून बारामती लोकसभा बूथप्रमुख, पश्चिम महाराष्ट्र सहसंयोजक आणि सध्या खडकवासला मतदारसंघातील महत्त्वाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली आहे.

धायरी गाव परिसरात सत्ता नसतानाही भारतीय जनता पक्षाचा झेंडा उंच ठेवणारा पहिला चेहरा म्हणजे संदीपभाऊ पोकळे.

त्यांनी नेहमी पक्षाच्या विचारांसाठी आणि हिंदुत्वासाठी ठाम उभे राहून काम केले. त्यांच्या कामाचा पाया आहे प्रामाणिकपणा आणि निष्ठा.

त्यांनी केवळ राजकारणातच नव्हे तर सामाजिक क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र मोठं योगदान दिलं आहे.

गावातील नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिरे, महिलांसाठी तीर्थयात्रा, तसेच विविध सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन त्यांनी केले. गावाची परंपरा आणि संस्कृती जपत त्यांनी दरवर्षी बैलपोळा सण, तसेच सर्वात मोठी बैलगाडा शर्यत उत्साहात आयोजित केली. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांमध्ये त्यांच्याबद्दल प्रचंड प्रेम आणि आदर आहे. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे आणि गिरीश बापट यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेला हा कार्यकर्ता पक्षाच्या संघटनात नेहमी अग्रस्थानी राहिला आहे.



त्यांचे संबंध मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ,मंत्री चंद्रकांतदादा पाटील, आ . भीमराव तापकीर आणि इतर वरिष्ठ नेत्यांशीही चांगले आहेत. या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी खडकवासला मतदारसंघात संघटन मजबूत केले आहे.

महानगरपालिकेत गावे समाविष्ट करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. मुंबईतील बैठका, कोर्टातील लढाई या सर्वांमध्ये त्यांनी आपला मुद्दा ठामपणे मांडला.

त्यांचे म्हणणे सोपे आहे – "जनतेचा प्रश्न सुटला पाहिजे, एवढंच माझं ध्येय आहे." दैनिक आरंभपर्व पुणेशी संवाद साधताना संदीपभाऊ म्हणाले, "मी ही निवडणूक माझ्यासाठी नाही लढत. मी ती माझ्या कार्यकर्त्यांसाठी, माझ्या मातीतल्या लोकांसाठी लढवतो आहे. जनतेच्या विश्वासामुळेच मी आज या टप्प्यावर आलो आहे.

**ज्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला, त्यांना अभिमान वाटेल असं काम करायचं आहे." आज परिसरातील प्रत्येक घरात, प्रत्येक गल्लीत त्यांचं नाव घेतलं जातं कारण त्यांनी लोकांशी केवळ संवाद नाही, तर नातं जोडले आहे. धायरी, शिवणे, खडकवासला परिसरातील नागरिकांच्या मनात आज एकच भावना आहे ."संदीपभाऊ म्हणजे आपला माणूस, आपलं बळ, आणि आपल्या विश्वासाचं प्रतीक!"**

**आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी त्यांचे प्रयत्न हे मोठे आहेत.. त्यामुळे त्यांच्याकडून मोठी अपेक्षा जनतेला आहे.**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com
• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



## महाराष्ट्र राज्य गुणवंत कामगारांच्या विविध मागण्यांचे निवेदन

मुंबई (आरंभ पर्व) : राज्य गुणवंत कामगार असोसिएशन संस्थापक अध्यक्ष मा. सुरेश शंकर केसरकर तसेच मुंबई जिल्हा अध्यक्ष मा. प्रभाकर तुकाराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुणवंत कामगार श्री राजेंद्र ज्ञानदेव कांबळे यांनी महाराष्ट्र राज्य गुणवंत कामगारांच्या मागण्या विविध विधानसभेत तसेच अधिवेशनात मांडण्यासाठी व मंजूर करून घेण्याबाबत भांडुप विधानसभेचे कार्यसम्राट आमदार माननीय अशोक धर्मराज पाटील यांना प्रत्यक्ष त्यांच्या ऑफिसला भेट देऊन पत्र समक्ष सादर केले त्यावेळी आपणास निदर्शनास आणून देतो की माननीय प्रधान सचिव कामगार यांच्या वतीने माननीय नामदार कामगार मंत्री महोदयांना शासनाच्या विविध विभाजनाचा पुरस्कारार्थीप्रमाणे महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या बसेस मधून सवलत मिळणे बाबत योजना स्वरूपात प्रस्ताव अंतिम मंजूर केलेला नाही या एकमेव करण्यासाठी राज्यातील विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महाराष्ट्र राज्य गुणवंत कामगार या योजनेचा लाभ मिळत नाही अतिशय महत्त्वाची बाब म्हणजे मंडळाच्या वतीने केलेल्या प्रस्तावामुळे राज्य सरकार वरती कोणत्याही स्वरूपाचा आर्थिक भार पडत नाही या योजनेच्या सर्व खर्च कामगार कल्याण मंडळ करणार आहे अशा बरेच मागण्या त्यावेळी सादर केल्या व समक्ष विनंती केली त्यावेळी कार्यसम्राट आमदार अशोक पाटील यांनी मी माझ्या परीने विधानसभेत मांडतो असे आश्वासन दिले.




## महा ई सेवा व आधार केंद्र चालकांचा संपाचा इशारा

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : अखिल स्तरीय महा ई सेवा व आधार केंद्र संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी आपल्या विविध मागण्यासाठी शासनाला इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी हवेली अप्पर तहसील अधिकारी मा.तृप्ती कोलते-पाटिल यांना शुक्रवार दि.07/11/2025 रोजी दिनांक 12 ते 14 नोव्हेंबर पर्यंत महा इ सेवा केंद्र बंद चे निवेदन पत्र दिले आहे. यावेळी अप्पर तहसील लोणी काळभोर, हवेली अध्यक्ष- राज गायकवाड (उरुळी कांचन) यांनी आपली सर्व महा ई सेवा केंद्र चालक /आधारकेंद्र चालक यांची व्यथा मांडली की, नागरिक व शासन यांच्यातील महात्वाचा दुवा हा महा ई सेवा केंद्र चालक हा सुरुवाती पासून होता. जेव्हा नागरिकांना सर्व दाखल्यासाठी शहरी भागाकडे धावपळ करावी लागत होती तेव्हा शासनाने नागरिकांच्या सोयीसाठी गावो-गावी महा ई सेवा केंद्राची स्थापना केली. बहुतांशी सर्व शासकीय दाखले हे महा ई सेवा केंद्र चालक स्वतः ऑनलाइन तयार करून जीव मुठीत ठेऊन प्रवास करून शहरी भागात जाऊन त्यावर संबंधित अधिकाऱ्यांच्या हस्तलिखित सह्या घेऊन ते दाखले लोकांना आपल्या गावातील नागरिकांना वितरित करत होता. परंतु आता शासनाला आता आमची गरज संपली अशा पद्धतीने शासनाने आम्हाला अलगद डावलण्याचे काम सुरू केले. सुरुवातीला गाव पातळीवर [VLE] म्हणजेच Village Lavel Enterpurum असे नाव देऊन आम्हाला काम दिले अणि आता आमचे व्यावसाय बंद करण्याच्या घाट घातला आहे. 15 /17 वर्ष आम्ही शासनाच्या सर्व नियमांचे पालन करून काम केले. / शासन आपल्या दारी कार्यक्रम असो की निवडणुकीचे कामकाज किंवा तहसीलदार कार्यालयात आलेला कामाचा अतिरिक्त काम हे आम्ही कोणताही मोबदला न घेता केले. त्याच्या बदल्यात शासनाने आम्हाला काय दिले.

## इंटरनॅशनल वर्कप्लेस ग्रुपची पुण्यामध्ये दोन नवीन रीगस केंद्राचे उद्घाटन

पुणे (आरंभ पर्व) : स्पेसेस आणि रीगस यांच्यासमवेत विविध ब्रँड्ससह काम करण्यासाठी जगातील सर्वात मोठे व्यासपीठ असलेल्या इंटरनॅशनल वर्कप्लेस ग्रुपने (आयडब्ल्यूजी) आज पुण्यात गौरव आयकॉन टॉवर आणि ४५ बाणेर स्ट्रीट येथे दोन नवीन रीगस केंद्रे उघडण्याची घोषणा केली. त्यामुळे भारतातील आघाडीच्या व्यावसायिक ठिकाणांपैकी एक असलेल्या ठिकाणी तिची उपस्थिती आणखी मजबूत झाली आहे. जगात आणि भारतात अधिक फ्लेक्झिबल कामकाजाच्या मॉडेल्सकडे कल वाढत असताना ग्राहकांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी आयडब्ल्यूजी स्वतःचे नेटवर्क वेगाने वाढवत आहे. ही नवीन केंद्रे आयडब्ल्यूजीच्या वेगाने वाढणाऱ्या भारतातील उपस्थितीला बळकटी देत असून त्यामुळे पुण्यातील व्यवसायांना प्रीमियम कार्यक्षेत्रे आणि जगभरातील ५,००० हून अधिक ठिकाणी त्वरित प्रवेश लाभत आहे. इंटरनॅशनल वर्कप्लेस ग्रुपचे सीईओ आणि संस्थापक मार्क डिक्सन म्हणाले, "या नवीन उद्घाटनासह आम्ही भारतात एक मजबूत आणि अत्यंत आवश्यक पाऊल ठेवत आहोत. एक महत्त्वाचे व्यवसाय केंद्र म्हणून पुणे ही आमच्यासाठी एक प्रमुख बाजारपेठ आहे. गौरव आयकॉन टॉवर येथील आणि ४५ बाणेर स्ट्रीट ही दोन्ही ठिकाणे आमच्या विस्तार योजनांना चालना देण्यासाठी उत्तम आहेत. व्यवस्थापन करारांतर्गत रीगस ब्रँड विकसित करून त्यांच्या इमारतींमध्ये अत्याधुनिक कार्यक्षेत्रे जोडली जावीत, यासाठी गौरव आयकॉन इन्फ्राटेकचे संचालक श्री. गौरव वाघमारे आणि रायचंदानी कन्स्ट्रक्शन्सचे भागीदार श्री. करण रायचंदानी यांच्यासोबत भागीदारीत काम करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. आयडब्ल्यूजीचा रीगस ब्रँड हा आजच्या हायब्रिड वर्कफोर्सच्या विकसनशील गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाईन केलेले व्यावसायिक आणि फ्लेक्झिबल वर्कस्पेस सोल्यूशन्स प्रदान करण्याशी समानार्थी बनला आहे. जागतिक उद्योगांपासून उदयोन्मुख स्टार्ट-अप्सपर्यंतच्या व्यवसायांना प्रेरणादायी कार्यालये, सहयोगी बैठक कक्ष आणि अखंड डिजिटल सेवांसह रीगस सक्षम बनवते.

# ओमॅक्सकडून हरमनप्रीत कौरची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती

## क्रीडा आणि खेळाडूंप्रती कंपनीची कटिबद्धता केली आणखी दृढ




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ओमॅक्स लिमिटेडने भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर यांची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती करण्याची घोषणा केली आहे. क्रीडा आणि जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा सामुदायिक विकास, आर्थिक संधी आणि राष्ट्र उभारणीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात, यावर असलेल्या ओमॅक्सच्या विश्वासाचे प्रतिबिंब या धोरणात्मक सहकार्यातून पडले आहे.

ही भागीदारी सेलिब्रिटींशी पारंपारिक कराराच्या पलीकडे जात नेतृत्व, लवचिकता आणि योग्य व्यासपीठ लाभल्यास प्रतिभांचे करिअरमध्ये रूपांतर कसे होऊ शकते, या विश्वासाच्या सामायिक मूल्यांवर आधारित आहे. क्रीडा उत्कृष्टतेला पाठिंबा देण्याच्या आणि खेळाडूंनी प्रगती करण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या ओमॅक्सच्या दृष्टिकोनाला हरमनप्रीतसोबतच्या भागीदारीमुळे बळ मिळत आहे. खेळ, विश्रांती आणि संस्कृतीसाठी एकात्मिक स्थान म्हणून गेल्या वर्षी द ओमॅक्स स्टेट लाँच करण्यात आले होते. त्याचाच आधार घेत केलेल्या या सहकार्यातून महत्त्वाकांक्षेचे रूपांतर प्रतिभेचे पोषण करणाऱ्या आणि उपजीविका निर्माण करणाऱ्या मूर्त सुविधा आणि कार्यक्रमांमध्ये करण्याच्या ओमॅक्सच्या हेतूचे प्रतिबिंब पडले आहे. भारताच्या महिला क्रिकेट संघाने विश्वचषकामध्ये एक प्रेरणादायी अध्याय लिहिला असताना या घडामोडीचा आनंद साजरा करण्यात आणि त्यांना पाठिंबा देण्यात ओमॅक्स देशासोबत उभा आहे.

या सहकार्याविषयी बोलताना हरमनप्रीत कौर म्हणाल्या, ओमॅक्सची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून सहभागी झाल्याचा आणि तरुणांना सक्षम बनविण्यावर, समुदायांना बळकट करण्यावर आणि स्वप्नांना प्रेरणा देणाऱ्या आणि त्यांना यशात रूपांतरित करणाऱ्या सुविधा निर्माण करण्यावर विश्वास ठेवणाऱ्या कंपनीसोबत उभे राहण्याचा मला अभिमान आहे."

**या सहकार्याअंतर्गत, ओमॅक्स आणि हरमनप्रीत कौर ॲथलेट्स विकास कार्यक्रम, तळागाळातील संपर्क, सामुदायिक कार्यक्रम आणि क्रीडा क्षेत्राला व्यवहार्य करिअर आणि सक्षमीकरणाचा स्रोत म्हणून जागरूकतेसाठी मोहिमा यांसारख्या उपक्रमांमध्ये सहयोग करतील. महिला सक्षमीकरण आणि क्रीडा क्षेत्रात महिलांच्या अधिक सहभागाला प्रोत्साहन देणे, तरुण मुलींना आत्मविश्वासाने त्यांच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यास प्रेरित करणे यावर मुख्य भर देण्यात येईल. मिश्र-वापर विकासांमध्ये क्रीडा, विरंगुळा आणि उपजीविकेच्या संधी यांचा मिलाफ करण्याच्या ओमॅक्सच्या प्रयत्नांनाही ही भागीदारी बळकटी देईल. त्यामुळे क्रीडा पायाभूत सुविधांचा लाभ उच्चभ्रू खेळाडूंनाच नव्हे तर संपूर्ण समुदायांना होईल, याची सुनिश्चिती होईल.**

ओमॅक्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. मोहित गोयल म्हणाले, "आम्ही हरमनप्रीतचे ओमॅक्स परिवारात मोठ्या अभिमानाने स्वागत करतो. तिच्या नेतृत्व, समर्पण आणि प्रेरणा देण्याच्या क्षमतेतून ओमॅक्सच्या उद्देशपूर्ण विकासासाठीच्या कटिबद्धतेचे प्रतिबिंब पडते. खेळांची सुलभता वाढविणारे, ॲथलेटिक्समध्ये महिलांच्या अधिक सहभागाला प्रोत्साहन देणारे आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकट करणारे व्यासपीठ तयार करण्यासाठी ही भागीदारी आहे. राष्ट्रीय राजधानीत १४० वर्षांपेक्षा अधिक काळानंतर एका नवीन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट स्टेडियमची निर्मिती हा या दृष्टिकोनाचा एक महत्त्वाचा परिणाम असेल - या शहरासाठी आणि भारतीय खेळासाठी हा एक मैलाचा दगड असेल."

*प्रीतिश वाधवा, स्तुती राजेश शाह आणि एशान शर्मा ठरले*

## 'एसबीआय लाईफ आयडिएशनएक्स २.०



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

भारतातील सर्वात विश्वासार्ह खासगी जीवन विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या एसबीआय लाईफ इन्शुरन्सने भारतीय जीवन विमा उद्योगासाठी नावीन्यपूर्ण उपाय शोधण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर एका उपक्रमाचे आयोजन केले होते. 'आयडिएशनएक्स 2.0' चा ग्रँड फिनाले नुकताच यशस्वीरित्या संपन्न झाला.

## टेन्थपिनने सेंटर फॉर लाईफ सायन्सेस क्लाऊड सोल्यूशन्सचे केले उद्घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लाइफ सायन्सेस कंपन्यांसाठी व्यवस्थापन आणि तंत्रज्ञान सल्लागार क्षेत्रातील जागतिक स्तरावरील अग्रणी कंपनी स्वित्झर्लंडमधील टेन्थपिन मॅनेजमेंट कन्सल्टंट्सने आज पुण्यात सेंटर फॉर लाइफ सायन्सेस क्लाऊड सोल्यूशन्स सुरू करण्याची घोषणा केली. या माध्यमातून लाइफ सायन्सेस व्यवसायात परिवर्तन घडवून आणण्यासाठी क्लाऊड आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित सोल्यूशन्सना समर्पित ग्लोबल सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना करण्यात आली आहे. या केंद्राचे ध्येय म्हणजे फार्मास्युटिकल, मेडटेक, बायोटेक, हेल्थकेअर, ॲनिमल हेल्थ आणि सीडीएमओसाठी भविष्यासाठी तयार क्लाउड सोल्यूशन्स विकसित



करणे आणि आणि उपयोगात आणणे हे या केंद्राचे ध्येय आहे.

जेणेकरून त्यांना विशिष्ट अनुपालन आणि जीवन विज्ञान उद्योगाशी संबंधित बारकावे हाताळण्यास मदत होईल, ज्यामुळे नियामक अनुपालन, रिअल-टाइम अंतर्दृष्टी, निर्बाध डेटा एकत्रीकरण आणि जागतिक मूल्य साखळीमध्ये वर्धित सहकार्य शक्य होईल.

यामुळे लाईफ सायन्सेस कंपन्यांना प्रगतीला गती मिळेल आणि रुग्णांचे निकाल सुधारता येतील. हे क्लाउड सोल्यूशन्स नवीन थेरपीज, बायोटेक आणि ॲडव्हान्स्ड थेरप्युटिक मेडिसिनल प्रोडक्ट्स, नवीन इंटरनेट ऑफ मेडिकल थिंग्ज (आयओएमटी) तसेच सीडीएमओच्या पुढील पिढीमध्ये विशेषतः प्रासंगिक होत आहेत. बाणेर येथील या अत्याधुनिक केंद्राचे उद्घाटन टेन्थपिनचे संस्थापक आणि कार्यकारी मंडळाचे सदस्य श्री. मायकल श्मिट यांनी केले. यावेळी पार्टनर आणि की अकाउंट डिलिव्हरी लीड स्टेफनी मार्क्स आणि टेन्थपिन इंडियाचे पार्टनर आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. सचिन भुरे उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना मायकल श्मिट म्हणाले, "पुण्यात आमच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन हा टेन्थपिनच्या जागतिक विकासाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

## कोटक म्युच्युअल फंडातर्फे कोटक रुरल अपॉर्च्युनिटीज फंड

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडने (केएमएएमसी) गुंतवणूकदारांसाठी कोटक रुरल अपॉर्च्युनिटीज फंड ही नवीन फंड योजना आणत असल्याची घोषणा केली आहे. मुदतमुक्त स्वरुपातील ही इक्विटी योजना प्रामुख्याने ग्रामीण अर्थव्यवस्था तसेच संबंधित संकल्पनावर आधारलेली आहे. सदर योजना गुंतवणूकदारांसाठी ६ नोव्हेंबर २०२५ ते २० नोव्हेंबर २०२५ पर्यंत सार्वजनिक गुंतवणूकीसाठी खुली राहणार आहे. भारतातील ग्रामीण परिवर्तनाशी संबंधित असलेल्या अथवा ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या परिवर्तनाचा फायदा मिळणाऱ्या कंपन्यांचे समभाग आणि समभागाशी संबंधित सिक्युरिटीजमध्ये हा फंड प्रामुख्याने गुंतवणूक करणार आहे.

अशा गुंतवणूकीतून दीर्घकालीन भांडवल वृध्दीची निर्मिती, हे या फंडाचे उद्दिष्ट आहे. या फंड योजनेसाठी निफ्टी रुरल इंडेक्स (TRI) हा आधारभूत निर्देशांक राहणार आहे. फंड योजनेच्या शुभारंभप्रसंगी बोलताना कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक निलेश शाह म्हणाले, "ग्रामीण भारत आता फक्त शेतीपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो भारताच्या विकासासाठी खुले झालेले एक नवे दालन आहे. आर्थिक समावेशापासून ते डिजिटल कनेक्टिव्हिटी आणि अगदी स्थानिक उत्पादनापर्यंत अशा नानाविध बाबींमुळे ग्रामीण भारत संधी, आकांक्षा आणि धोरणांनी प्रेरित अशा परिवर्तनाचा एक नवीन पैलू ठरला आहे. ग्रामीण भागातील वाढते उत्पन्न आणि ग्राहकपयोगी वस्तूंचा वाढता उपभोग आता भारताच्या ढोबळ अर्थप्रणालीचे अविभाज्य अंग बनले आहे. गुंतवणूकदारांना विकासाच्या या परिवर्तनात सहभागी होण्यास मदत करणे, हा कोटक रुरल अपॉर्च्युनिटीज फंडाचा उद्देश आहे आणि हा उद्देश भारताच्या सर्वसमावेशक आणि संतुलित आर्थिक विकासाच्या प्रवासाशी अतिशय मिळताजुळता आहे."ग्रामीण भारत हा आता केवळ शेतीपुरता मर्यादीत राहिलेला नसून शेतीच्या पलीकडे झपाट्याने विकसित होत चालला आहे.

ग्रामीण भागातील सुमारे ४० टक्के कामगार आता बिगर-कृषी नोकऱ्यांमध्ये कार्यरत आहेत. कामगार संख्येमध्ये २०१८ पासून महिलांचा सहभाग जवळजवळ दुप्पट झाला आहे. त्यामुळे दुहेरी उत्पन्न असलेल्या कुटुंबांच्या संख्येमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. ग्रामीण भागात निम्म्याहून अधिक खर्च आता बिगर-अन्न वस्तूंवर होत आहे. उत्पन्न, आकांक्षा आणि वस्तूंचा उपभोग या गतिमान केंद्रांकडे ग्रामीण भाग झपाट्याने वाटचाल करत असल्याचे यातून दिसून येते. (स्रोत: पीएलएफएस, नाबार्ड, मॉर्गन स्टॅनली).

## विज्ञान विभागासाठी विशेष ओपीडी सेवा सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मुंबई यांनी आज गॅस्ट्रोहब हॉस्पिटल, पुणे यांच्या सहकार्याने हिपॅटोबिलियरी, स्वादुपिंड (पॅनक्रियाटिक) आणि आतड्यांसंबंधित (इंटेस्टायनल) ओपीडी सेवा सुरू केल्याची घोषणा केली. या सेवांचा शुभारंभ डॉ. गौरव चौबल, संचालक – एचपीबी सर्जरी, लिव्हर आणि मल्टी-ऑर्गन ट्रान्सप्लांट, नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मुंबई यांच्या उपस्थितीत झाला. या ओपीडी सेवांचा उद्देश म्हणजे यकृत, आतडे आणि स्वादुपिंडाशी संबंधित आजारांनी ग्रस्त रुग्णांना तज्ज्ञ सल्ला व अत्याधुनिक उपचार सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच वेळीच निदान आणि घराजवळ विशेष उपचार मिळवून देणे हा आहे.

डॉ. गौरव चौबल हे गॅस्ट्रोहब हॉस्पिटल, पुणे येथे दर शुक्रवारी सकाळी ११:०० ते दुपारी १:०० वाजेपर्यंत प्राथमिक सल्लामसलत आणि फॉलो-अपसाठी उपलब्ध राहतील.

## गुंतागुंतीच्या मुत्ररोग समस्येवर एस हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी वापरलेल्या

# नवीन रोबोटिक सर्जिकल तंत्राची आंतरराष्ट्रीय नियतकालिकेत नोंद

- **हे तंत्र वापरून केलेली जगातील पहिली शस्त्रक्रिया**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ज्येष्ठ मुत्ररोग तज्ञ व एस हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ.सुरेश पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली मुत्ररोग तज्ञ डॉ.गुरूराज पडसलगी,डॉ.सचिन भुजबळ, डॉ.सौरभ उपलेंचवार यांनी नुकतेच मुत्रपिंडासंबंधी गुंतागुंतीच्या परिस्थितीवर रोबोटिकच्या साहाय्याने लॅप्रोस्कोपिक पायलोलिथुमी आणि बक्कल म्युकोसल ग्राफ्ट (बीएमजी) या एकाच वेळी दोन प्रक्रिया केल्या. हे नवीन तंत्र गुंतागुंतीच्या मुत्रपिंडाच्या स्थितीत रोबोटिक तंत्रज्ञानाच्या वापरामध्ये एक महत्त्वाचा टप्पा आहे. शास्त्रीय नियतकालिकेमध्ये प्रकाशित होणारी अशा प्रकारची जगातील ही पहिलीच रोबोटिक शस्त्रक्रिया आहे. याबाबतचा निबंध नुकताच जर्नल ऑफ रोबोटिक सर्जरी जर्मनी येथे प्रकाशित झाला. याबाबत माहिती देताना एस हॉस्पिटल,एरंडवणे पुणे चे अध्यक्ष प्रा.डॉ.सुरेश पाटणकर म्हणाले की, काही काळापूर्वी आमच्या रूग्णालयात पोटदुखीची तक्रार घेऊन 41 वर्षीय पुरूष रूग्ण आला होता. निदानामध्ये त्यांचे मुत्रपिंड शरीरातील सामान्य नैसर्गिक ठिकाणीऐवजी ओटीपोटात असल्याचे आढळून आले. या स्थितीला एक्टोपिक किडनी असे म्हणतात आणि ही एक दुर्मिळ जन्मजात स्थिती असते. त्याशिवाय त्याला अनेक मुतखडे झाल्याचे आढळले आणि मुत्रपिंड व मुत्रवाहिनी जोडणाऱ्या भागात अडथळा निर्माण झाला होता. साधारणत: अशा असामान्य शरीर रचना आणि गुंतागुंतीचा धोका असलेल्या स्थितींवर उपचार करणे अत्यंत कठिण असते.

एक्टोपिक किडनी ही या दुर्मिळ जन्मजात स्थितीमध्ये मुत्रपिंड व मुत्रवाहिनी जोडणाऱ्या भागात अडथळे तर असू शकतात परंतु मुतखडे सहसा आढळत नाहीत. असामान्य रचना,छोटी मुत्रवाहिनी,रक्तवाहिन्यांची गुंतागुंतीची स्थिती आणि नजिकचा आतड्यांचा परिसर यामुळे कुठलीही प्रक्रिया करणे आव्हानात्मक असते. लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रिया ही खुल्या शस्त्रक्रियेपेक्षा सुरक्षित मानली जाते आणि रूग्ण लवकर बरा होतो.मात्र तांत्रिकदृष्टया अशा स्थितीत ही प्रक्रिया कठिण आणि शल्यचिकित्सकांसाठी जास्त वेळ लागणारी ठरू शकते.ज्या रूग्णांना आधीपासून मुतखड्यांचा त्रास आहे,त्यांच्या मुत्रपिंडामध्ये व्रण आणि दाह त्रासदायक ठरू शकते. तसेच उतींना नाजूक बनू शकतो. त्यामुळे अशा प्रकारच्या स्थितीत टाके घातल्यामुळे या उतींना नुकसान पोहचू शकतात आणि रक्तस्त्राव,संसर्ग आणि इतर गुंतागुंत होण्याचा धोका वाढू शकतो. याआधीच्या वैद्यकीय मार्गदर्शक तत्त्वांनुसार अशी शस्त्रक्रिया दोन टप्प्यांत करण्याची शिफारस आहे,मात्र रोबोटिक तंत्रज्ञानामुळे गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया देखील सुरक्षित,अधिक कार्यक्षम आणि रूग्ण व शल्यचिकित्सकांसाठी कमी तणाव निर्माण करणाऱ्या झाल्या आहेत.

त्यामुळे एस हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या टीमने रोबोटिक शस्त्रक्रिया करायचे ठरविले,असे डॉ.पाटणकर म्हणाले, रोबोटिक शस्त्रक्रिया प्रणाली वापरून मुतखडा काढण्याची आणि मुत्रपिंडातील बिघाड दुरूस्त करण्याची प्रक्रिया आम्हाला अचूकतेने एकाच वेळेस करता आली. मात्र अनेक मुतखडे आणि मुत्रमार्गाला याआधीच झालेल्या नुकसानामुळे ही प्रक्रिया आव्हानात्मक होती. अशा प्रकारची गुंतागुंतीची स्थिती हाताळण्यासाठी कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे नाहीत. मुतखडे काढण्याबरोबरच मुत्रपिंड आणि मुत्रवाहिका जिथे मिळते त्या भागात आकुंचन आणि कडकपणामुळे निर्माण झालेला अडथळा काढून टाकण्यासाठी तोंडातील गालाच्या आतील त्वचेचा थोडासा भाग काढून तिथे बसविण्यात आला.

त्यानंतर रूग्णाची प्रगती जलदरित्या झाली आणि शस्त्रक्रियेनंतर चार दिवसांतच त्याला डिस्चार्ज देण्यात आला. उपलब्ध वैद्यकीय साहित्याचे सविस्तर शोध घेत एक्टोपिक पेल्विक किडनी या स्थितीत अशा प्रकारची मुतखडे काढण्याची आणि त्याचवेळेस बक्कल म्युकोसल ग्राफ्ट (बीएमजी) याची कुठलीही नोंद नसल्याचे आढळून आले. आमचा हा दावा जर्नल ऑफ रोबोटिक सर्जरी या प्रतिष्ठित नियतकालिकेने मान्य करत ही प्रक्रिया प्रकाशित केली आहे.

**डॉ.पाटणकर पुढे म्हणाले की,एस हॉस्पिटलने आतापर्यंत कर्करोग व पुर्नबांधणी अशा प्रोस्टेट आणि किडनी संबंधी अनेक शस्त्रक्रिया केल्या आहेत. मात्र ही शस्त्रक्रिया एक महत्त्वाचा टप्पा आहे. सर्वांत आव्हानात्मक स्थितीत रोबोटिक प्रणालीच्या साहाय्याने सुरक्षित व अचूक प्रक्रिया आपण करू शकतो,हे अधोरेखित करत मुत्रविज्ञानात परिवर्तन घडवत आहे. शस्त्रक्रिया करताना हालचालींमध्ये अधिक लवचिकता,त्रिमितीय प्रतिमा,सुधारित एर्गोनॉमिक्स व शल्यचिकित्सांच्या कौशल्यामुळे गुंतागुंतीच्या प्रक्रिया अचूकतेने केली जाऊ शकते. रूग्णांना याचे चांगले परिणाम मिळतात. शल्यचिकित्सकांच्या टीम मध्ये प्रा.डॉ.सुरेश पाटणकर यांच्यासह मुत्ररोग तज्ञ डॉ.गुरूराज पडसलगी,डॉ. सचिन भुजबळ, डॉ.सौरभ उपलेंचवार यांच्याबरोबर भूलतज्ञ डॉ.सोनाली वस्ते, डॉ.सुचिता हार्डिकर आणि डॉ.नेहा बनवट यांचा समावेश होता.**